## प्रकरण पहिले

# दलित कादंबरी वाटचाल व विकास

# प्रकरण पहिले

# दलित कादंबरी वाटचाल व विकास

## प्रास्ताविक :

दलित कादंबरी हा १९६० नंतर मराठी साहित्यात लक्ष वेधून घेणारा दलित साहित्याचा प्रवाह महत्त्वपूर्ण असाच आहे. दलित साहित्याच्या तुलनेत दलित कादंबरीचा विकास फार मोठया प्रमाणात झालेला दिसून येत नसला, तरी तो उपेक्षणीय नाही. दलित कादंबरी ही सामाजिक-वास्तववादी कादंबरी होय. कादंबरीकार हा जसा तत्कालीन समाजाच्या भूतकाळ वर्तमानकाळाच्या स्थितीगतीचा वेध घेणारा इतिहासकार आणि भाष्यकार ही असतो.

दलित कादंबरीने पूर्वास्पृश्य महार समाजातील तसेच अन्य विविध वर्ग व स्तर यांचे आर्थिक, सांस्कृतिक, मागासलेपण, त्याचप्रमाणे सामाजिक विषमतेकडे त्यांना जे दु:ख भोगावे लागते, त्याचे चित्रण दलित कांदबऱ्यांमधून केलेले आहे. दलित लेखकांनी आपल्या समाजाशी, लोकजीवनाशी समरस होऊन आपले भलेबुरे अनुभव प्रक्षुब्ध स्वरूपात मांडलेले आहेत. हे करत असताना प्रत्यक्ष जीवनाबरोबरच भाषा, समजुती, रूढी, राहणी, पोषाख, दैवते, सणवार, उत्सव, जत्रा, प्रथा-परपंरा, अंधश्रद्धा, देवदेवस्की याबरोबरच आंबेडकरांच्यानंतर आपल्या समाजात झालेल्या परिवर्तनाचाही वेध घेतलेला आहे.

## दलित साहित्यातील कादंबरीची वाटचाल :

दलित साहित्यातील 'कादंबरी' च्या वाटचालीचा विचार करता आपण 'दलित कादंबरी' असा शब्दप्रयोग वापरतो. त्यावेळी त्या कादंबरीची सामाजिक पार्श्वभूमी

आपण लक्षात घेत असतो. एका अर्थाने दलित कादंबरी ही सामाजिक कादंबरीच असते. सामाजिक कादंबरीला जशी स्थलकाल विषयक पार्श्वभूमी असते. तशीच पार्श्वभूमी कोणत्याही कादंबरीत असते. तिचे कथानक वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर गोवलेले असते. कोणत्याही कादंबरीचे कथानक हा तत्कालीन समाजाच्या अथवा समाजमनाच्या कालविषयक वैशिष्टयांच्या, चालीरीतीचा प्रभाव परंपरांचा असतो. सामाजिक कांदबरीत सामाजिक आशय व्यक्त करताना सामाजिक पार्श्वभूमीचे जिवंत चित्रण असल्याशिवाय तिला परिणामकारकता प्राप्त होत नाही.

मराठी कादंबरीचा प्रारंभ विधवेच्या कारूण्यजनक स्थितीचे चित्रण करण्याचा मान बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' ( १८५७) या सामाजिक कादंबरीने झाला दलित कादंबरी ही १९६० नंतर मराठी साहित्यात लक्ष वेधून घेणाऱ्या दलित साहित्याची एक महत्त्वपूर्ण शाखा होय. एकूणनच, दलित साहित्याच्या तुलनेत दलित कादंबरीचा विकास फार मोठया प्रमाणावर झाला आहे असे म्हणता येत नाही. तरीही या शाखेची उपेक्षा करावी एवढया कमी प्रमाणातही या कादंबरीची संख्या आहे असे मानावयाचे कारण नाही. वर म्हटल्याप्रमाणे दलित कादंबरी ही सामाजिक कादंबरी आहे. सामाजिक कादंबरीकार जसा तत्कालीन समाजाचा भाष्यकार असतो. तसेच दलित कादंबरीकार आपल्या समाजाच्या भूतकाळ व वर्तमानकाळाच्या स्थितीगतीचा वेध घेणारा इतिहासकार व भाष्यकार असतो.

दलित शोषितांच्या दु:ख जाणिवांची अभिव्यक्ती करणारी कादंबरी म्हणजे दलित कादंबरी होय. ही व्याख्या विवंचनार्थ स्वीकारून एकंदरीत दलित कादंबरी ही दलितावरील अत्याचार त्यांना मिळणारी वर्तणूक, दलितांची व अत्याचार करणाऱ्यांची अस्मिता या साऱ्यांची नोंद करीत त्यांच्यातील संघर्षाचे दर्शन वाचकांना घडवित नव्या

जाणीवा व नव्या मूल्यांचा पुरस्कार करीत आत्माविष्कारासह व्यापक समाजजीवनाचे दर्शन घडवित परिवर्तनास पूरक ठरणारी आहे.

**दलित कादंबरीच्या पाऊलखुणा :**

साठोत्तरी दलित कादंबरी अशी आज आपल्या वेगळया रूपरंगाच्या शोधात असली तरी या कादंबरीचे पूर्वपरंपरेशी नाते आहे. हे आपण नाकारू शकत नाही. त्यामुळे मराठी कादंबरीत दलित जीवनाचे प्रथम चित्रण श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'श्याम सुंदर' (१९२५) या कादंबरीत येते. तद्नंतर खांडेकर यांनी 'दोन-ध्रुव' (१९३५) आणि 'दोन मने' (१९३८) या कादंबऱ्यातून अस्पृश्यांचे खेडयातील जीवनदर्शन घडविले. दलित जीवनाचे सहानुभूतीपूर्व चित्रण ग.त्र्यं.माडखोलकर यांनी 'चंदनवाडी', (१९४३) या कादंबरीत केले. विभावरी शिरूरकर यांची मांग गारूडी यांच्या जीवनातील 'बळी' कादंबरी (१९५०), र.वा.दिघे यांची 'कार्तिकी', ग.रा.भिसे यांची 'जंगलातील डायरी' (१९४५) व 'सावलीच्या उन्हात' (१९४६) व वा.ब.कार्तिक यांची 'वाडगीण' (१९५१), आदिवासी व भिल्ल जमातीचे चित्रण करणाऱ्या होत. हमीद दलवाई यांची 'इंधन' कादंबरीही (१९५१) दलित मुस्लिम संघर्षाचे चित्रण करणारी कादंबरी होय. असा हा दलित कादंबरीच्या पाऊलखुणा दाखविण्याचा प्रवास होय. हा वेध दलित कादंबरीचा विकास लक्षात घेण्यासाठी घेतला आहे. दलितेतर कादंबरींचा विचार केल्यानंतर दलित कादंबरीकारांचा विचार करणे आवश्यक वाटते.

**साठोत्तरी दलित जाणिवेची कादंबरी :**

दलित कादंबरीमधून दलित जाणिवेच्या बहुतांश प्रेरणा आणि प्रवृत्ती यांचे दर्शन घडते. परंतु दलित कविता, कथा, स्वकथने यातून जेवढया पुरेशा प्रमाणात प्रकर्षाने दलित साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्तीचे प्रतिबिंब पडलेले आढळते तेवढया प्रमाणात दलित कादंबरीतून त्यांचे चित्रण झालेले आढळत नसले तरी देखील, त्यांचे महत्त्व कमी मानता

येणार नाही. कदाचित कादंबरीचे दीर्घत्व हे दलित वेदना व तीव्रता कायम राखण्यास अडथळा करणारे ठरत असावे. असे म्हटले जाते की, दलित आत्मकथने जर प्रथम लिहिली असती तर कदाचित दलित कादंबरीच्या दृष्टीने ती हितकारक ठरली असती. कारण त्यामुळे आशयद्रव्याची उपलब्धता कादंबरीला दाहक नसते. बऱ्याचशा दलित कादंबऱ्या हया आत्मानुभवाच्या मार्गाने जाताना दिसतात. किंवा आत्मपर अनुभव हा दलित्वाचा स्पर्श देऊन लिहिल्या जाताना दिसतात.

**कादंबरीचा प्रारंभ व दलित कादंबरी :**

मराठी वाङ्मयातील कादंबरीचा विचार करत असताना या वाङ्मय प्रकाराची सुरूवात इंग्रजांच्या सहवासने भारतामध्ये १९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुधारणेचे वारे वाहू लागले. नवीन शिकणाऱ्या भारतीय तरूणांना आपल्या समाजातील प्रचलित असलेल्या अनिष्ट रूढी समाजाला घातक आहेत याची जाणीव होऊन समाजाच्या उन्नतीसाठी आपली समाज व्यवस्था व रूढी परंपरा बदलल्या पाहिजेत अशी भूमिका विचारवंतांनी घेतली.

या सुधारणावादी लोकांनी स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, बालविवाह, केशवपन, विधवांची दु:खे इ. विषयी धारकांनी लेखन करून जागृती केली. त्यातूनच हरिभाऊंची ‘यमुनापर्यटन’ कादंबरी निर्माण झाली. स्त्री समस्यांचे हे चित्रण मराठी कादंबरीत सुरू असताना १९२० नंतर इतरही सामाजिक प्रश्नाकडे कादंबरीकाराची दृष्टी वळली. १९२० च्या नंतर गांधीजींचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यात प्रवेश झाला. गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीबरोबर समाज सुधारणेलाही महत्त्व दिले. त्यांनी खरा भारत शहरात नसून खेड्यात आहे म्हणून ‘खेड्याकडे चला’ हा मंत्र दिला. या गांधीजींच्या संदेशामुळे गांधीवादी विचारसणीचे लेखक ग्रामीण आणि अस्पृश्य समाजाचे चित्रण

आपल्या कादंबऱ्यातून करू लागले. व त्याचवेळी मार्क्सवादी विचार सरणीचे वारे वाहू लागले होते. त्याचाही परिणाम कादंबरीत होऊ लागला.

दलित कादंबरीला सुरूवात ही खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यामुळे झाली असे म्हणावे लागते. कारण दलित समाजात स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. बाबाबसाहेब आंबेडकरांनी केले आहे. डॉ. आंबेडकरांनी सुरवातीच्या काळात त्यांनी अवलंबिलेले सत्याग्रहाचे धोरण, पुणे करार, धर्मांतराची घोषणा या घटना कादंबरीच्या आशय रूपाने होऊ लागल्या. गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव, साम्यवादी विचार आणि आंबेडकरांनी चालू केलेल्या दलितोद्धाराच्या कार्यानिमित्त घडलेल्या घटना या सर्वांचा परिणाम झाल्यामुळे मराठी कादंबरीत दलित समाज जीवन चित्रित होऊ लागले.

दलित समाज जीवन चित्रणाची सुरूवात श्री.कृ. कोल्हटकर यांनी १९२५ साली लिहिलेल्या 'श्यामसुंदर' या कादंबरीपासून झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात वामन मल्हार, खांडेकर, फडके, भा.वि.वरेरकर इत्यादींनी जी वर्णने केलेली आहेत, त्या कादंबऱ्या म्हणजे वि.स. खांडेकर यांची 'दोन मने' (१९३८). या कादंबरीत सार्वजनिक तळ्याचे पाणी अस्पृश्यांना मिळावे म्हणून केलेल्या सत्याग्रहाचे चित्रण येते. ना.सी.फडके यांची 'प्रतिज्ञा'(१९४१) या कादंबरीतील अस्पृश्य समाज रामनवमीच्या दिवशी राममंदिर प्रवेशासाठी खुले व्हावे. त्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवतात, व त्याचवेळी रामनवमीच्या दिवशी अस्पृश्य स्त्रिया स्त्रियांच्यात मिसळून राममंदिरात जातात.

गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव पडून वामन मल्हार यांच्या 'इंदू काळे सरला भोळे' (१९३४) या कादंबरीतील विनायकराव भोळे आपल्या रात्रीच्या शाळेत सनातनी लोकांचा विरोध पत्करून अस्पृश्य मुले घेतात. ते चिंगी नावाच्या महार जातीतील

मुलीला आपल्या घरी सांभाळतात. पुढे ते चिंगीचे लग्न मुंबईच्या एका सुशिक्षित माणसांशी लावून देतात असे वर्णन आढळून येते.

वि.वा.हडप हे उच्चवर्णीय पती-पत्नी अस्पृश्यांच्या सुधारणेसाठी प्रयत्न करतात. गांधीजींच्या विचाराने हिंदू धर्मातील सनातनी विचाराच्या व्यक्तींचे हृदय परिवर्तन होत आहे. त्यामुळे कालांतराने का होईना अस्पृश्यता नष्ट होईल असा विचार मांडायला या काळातील कादंबरीकार पुढे झालेले दिसतात. या काळातील दलितेतर लेखक दलित लोकांच्याकडे सहानुभूतीच्या भूमिकेतून अस्पृश्य समाजाचे चित्रण करतात. यांच्या वर्णनामध्ये दु:खाचे, अन्याय, अत्याचाराचे चित्रण येते. ते अगदी वरवरच्या स्वरूपाचे असते. दलितेतर कादंबरीकार विशिष्ट विचार प्रणालीतून दलित समाज जीवनाकडे पाहतात. आणि म्हणून त्यांनी केलेल्या चित्रणात उणिवा सापडतात.

दलितेतर कादंबरीचा विचार केल्यानंतर दलित कादंबरीकारांचा विचार करणे आवश्यक वाटते. त्यासाठी दलित वाङ्मयामधील दलित कादंबरी या वाङ्मय प्रकारातील पहिली कादंबरी कोणती याचा विचार करणे गरजेचे वाटते. त्यामध्ये ना.रा.शेंडे यांची 'काजळी रात्र' (१९५६), त्यानंतर 'माणुसकीची हाक' (१९५७), व 'फकिरा' (१९५९) इ.कादंबऱ्या आहेत. 'काजळी रात्र' ही दलित कादंबरीतील पहिली कादंबरी आहे. पण खऱ्या अर्थाने या कादंबरीमधून दलितांच्या जीवनाचे घटना, प्रसंग येतात. तेही अगदी वरवरच्या स्वरूपाचे येतात. त्यामुळे या कादंबरीला दलित म्हणावे, की नाही हा प्रश्न पडतो. हाही प्रश्न पडतो. 'काजळी रात्र' मधील कथानक या कादंबरीमध्ये महारातील एक मुलगा पाणी प्यायला गेल्यानंतर तिथे सवर्ण त्याला मारहाण करतात. त्यांच्या तावडीतून त्या मुलाला दयाळ बाबा ही सवर्ण व्यक्ती सोडवून घेतात. अशा दु:ख प्रसंगाचे चित्रण पाहिल्यानंतर दयाळ बाबाचे हृदय परिवर्तन होते. व त्यामुळे आपली विहीर व स्वत:च्या मालकीचे देऊळ दलितांना खुले करतात. पण हयाच दयाळ

बाबाचे वैभव लयाला गेल्यानंतर कृष्णा या महार समाजातील व्यक्तीने त्याचे उपकार जाणलेले आहेत. व त्याला आपल्या आश्रयाला घेतले आहे. हेच मुख्य कथासूत्र या कादंबरीत येते. तसेच एक महार मुलगा व एक ब्राह्मण मुलगी यांचे प्रेमसबंधाचे कथानक ही यामध्ये येते. लेखक दलित असूनही स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित समाजाच्या जीवन व्यवहाराचे कसलेही दर्शन कादंबरीतून घडत नाही. म्हणून ही नुसती नावालाच दलित समाजाचे चित्रण करणारी कादंबरी म्हणावी लागेल. या कादंबरीतील कथानक अनेक अद्‌भूत रम्य घटना, प्रसंगांनी भरलेले आहे. म्हणून या कादंबरीला दलित कादंबरी म्हणावी की नाही ? हा प्रश्न पडतो.

दलित कादंबरी म्हणून जिचा उल्लेख करता येईल अशी दुसरी कादंबरी म्हणजे शंकरराव खरातांची ‘माणुसकीची हाक’ ही होय. ही कादंबरी आंबेडकरी विचारसरणीतून लिहिली आहे. आतापर्यंत पाहिलेल्या दलितेतरांच्या कादंबऱ्यामधून आलेल्या आशयापेक्षा वेगळा आशय तिच्यामध्ये आलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायासह १९५६ साली धर्मांतर केले त्यानंतर महार समाजात झालेले परिवर्तन या कादंबरीत चित्रित झाले आहे. वरील दोन कादंबऱ्यानंतर ‘फकिरा’ ही अण्णाभाऊ साठे यांची ही कादंबरी फार महत्त्वपूर्ण ठरते. या कादंबरीत दलित समाजातील मांग जातीचे चित्रण येते. हे चित्रण अनेक दृष्टीने वेगळे आणि महत्त्वाचे आहे. अण्णा भाऊंनी या कादंबरीची सुरूवातच दलित जाणिवेतूनच केलेली दिसून येते. कादंबरीच्या सुरूवातीलाच निवडूंगाच्या फडात वसलेली मांगाची वस्ती दिसते. दारिद्रय त्यांच्या पाचविलाच पुजले होते. ‘‘आकाशातून पावसाच्या धारा लागल्या की, मांगाच्या डोळ्यातून आसू गळू लागतात. तरणी माणसं कंबर बांधून पाणी पिऊन दिवस रेटीत जुलुमानं जगत. भीक मागत अपमान मानणारी ही जात खुशाल

गुळेकडे पाहात विचार करी. विचार करून करून त्यांच्यापुढे एकच मार्ग उरायचा तो म्हणजे शिवारातील पिकांच्या चोरीचा."

अण्णाभाऊंनी 'फकिरा' मध्ये केलेले मांग समाजाच्या चित्रणातून त्यांना सोसाव्या लागणाऱ्या, व्यथा, वेदना, दु:ख यांची जाणीव वैशिष्ट्यपूर्ण आहे. तो अस्पृश्यास्पृश्यतेचा वेडगळ कल्पनांनी भाजलेला अन्याय, कायदयांनी भरडलेला अज्ञान व दैन्य यांनी नाडलेला आहे. पण या दु:खाने तो झुकत नाही तर अन्यायाने पेटून उठतो. बंडाची भाषा बोलतो. आणि कृती ही करतो.

अशा पद्धतीने १९५९ साली प्रकाशित झालेली अण्णाभाऊ यांची 'फकिरा' ही कादंबरी मानता येईल. येथूनच खऱ्या अर्थाने कादंबरीची सुरूवात झालेली पहावयास मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारे मानवी स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा, आणि मानवी मूल्य हे त्यांच्या लेखनाचे आधार अण्णा भाऊंच्या 'फकिरा' कादंबरीत दिसून येतात. म्हणून या कादंबरीला पहिली दलित कादंबरी मानायला हवी असे वाटते.

दलित साहित्याच्या प्रवाहामध्ये कविता, कथा, आत्मकथने यांच्या मानाने दलित कादंबरी हा वाङ्मय प्रकार तसा अजून प्रबळ आणि प्रभावी झालेला दिसून येत नसला तरी, त्याचे महत्त्व कमी आहे असे मानता येत नाही. दलित साहित्याच्या निर्मितीच्या चार पिढ्या आज दिसून येतात. पहिली पिढी ही प्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत सक्रीय होती. त्या पिढीने स्वातंत्र्यपूर्व काळ पाहिला. दुसऱ्या पिढीची जडणघडण खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळात झाली. ही पिढी धर्मांतराच्या ऐतिहासिक घटनेला साक्ष आहे. तिसरी पिढी धर्मांतराच्या सुमारास व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाहणानंतर जन्माला आली. चौथी पिढी दलित साहित्याचा प्रवाह नावारूपाला येत असताना जन्मास आली. दलित साहित्याच्या सुरूवातीच्या दोन पिढ्यापेक्षा तिसऱ्या व चौथ्या पिढीत कादंबरी लेखनात वाढ झालेली पहावयास मिळते. आज दलित लेखकांनी

जवळपास पाऊणशेच्यावर कादंबऱ्या लिहिल्या आहेत. सुरूवातीचे कादंबरी लेखन दलितांवर सवर्णांकडून होणारे अन्याय, अत्याचार व दलित समस्या मांडताना दिसते.

दलित कादंबरीकारांमध्ये अण्णाभाऊ साठे यांना अनन्यसाधारण सर्वप्रथम दर्जाचे स्थान देण्यात येते. साठे हे मुळातच दलित समाजातील उपेक्षित असणाऱ्या मातंग जातीत जन्मल्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेले दु:ख, वेदना, जे जीवन जगले, भोगले व अनुभवले तेच त्यांनी आपल्या अनेक कादंबऱ्यातून मांडलेले आहे. अण्णाभाऊंचे कादंबरी लेखन वाङ्मयीनदृष्ट्या अधिक समृद्ध आहे. त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यापैकी 'फकिरा'(१९५९), 'माकडीचा माळ'(१९६३), 'वैजयंता', 'डोळे मोडीत राधा चाले' (१९५९), 'वारणेचा वाघ' (१९६८) इ. कादंबऱ्या गाजल्या आहेत. पण या सर्वात 'फकिरा', 'वारणेचा वाघ' या कादंबऱ्या जास्त प्रमाणात गाजल्या या सर्व कादंबऱ्यात 'फकिरा' ही गुणात्मकदृष्ट्या सर्वाहून अधिक उठून दिसते. 'फकिरा' ही कादंबरी मातंग जमातीच्या गुन्हेगार जीवनावरील प्रभावी वाङ्मयनिर्मिती आहे. ही मातंग समाजातील एका स्वाभिमानी, जागृत समाजाच्या संघर्षपूर्ण आंदोलनाची कथा आहे. 'फकिरा 'हा या कादंबरीचा नायक असून तो कुटुंबवत्सल, उदार व सज्ज माणूस, पण अन्याविरूद्ध उठणारा, जाणीवपूर्वक प्रसंगी कायदाही हाती घेणारा, तो अन्यायाविरूद्ध बंड करण्यास सज्ज होणारा महार-मांग 'गुन्हेगार' जमातीसाठी धान्य लुटून भुकेलेल्यांना उपासपोटी तळमळणाऱ्या माणसांना धान्य वाटणारा असा आहे.

फकिराचा भाऊ साधूव इशा, किशा, भिवा, पिराजी ही मंडळी अन्याय जुलमाविरूद्ध प्रतिकाराच्या भावनेने पेटलेली ही पात्रे आहेत. फकिराचे हे बंड भाकरीच्या निमित्ताने चाललेले असले तरी ते न्यायासाठी, सन्मानासाठी चाललेले बंड आहे. सरंजामी संस्कृतीमधील दोन गटांमध्ये अस्तित्वासाठी चाललेल्या संघर्षात फकिरा जोगणीसाठी एका बाजूने लढतो. दुसऱ्या एका प्रसंगी ध्वनी ज्याच्या रखवालदार रघु

वामन याची पत्नी व दोन तरूण मुली अब्रूच्या भीतीने बावरल्याचे दिसताच फकिराला भडभडून आले. तो म्हणाला, ''आई ! थांब, खजिना न्हेणार हाय. तुम्हासनी ओरबडाय मी आलो न्हाय. कारण अब्रू खाऊन उपाशी माणसं जगत नसतात, जावा आपल्या घरात बसा.''[२] अधिक फापटपसारा न वाढविता या कादंबरीमध्ये मानवी मनातील मूलभूत प्रवृत्तींना आवाहन करण्याचे सामर्थ्य अण्णाभाऊंनी साकाळलेले आहे.

'वारणेचा वाघ' या कादंबरीत अण्णाभाऊंनी खून करून फरारी झालेला सत्तू सारख्या व्यक्तीचा परामर्श घेतला आहे. या कादंबरीमध्ये कुंपणाची काडी मोडली म्हणून सवर्ण चौगुला, सई या दलित स्त्रीला लाथाबुक्यांनी मारतो. ती आपल्या पोटातील गर्भ सांभाळत मार खाते. हा दलित स्त्रीवर होत असलेला अत्याचार सहन न होऊन सत्तू भोसले, चौगुल्याचा खून करून फरारी झालेला सत्तू वारणेच्या खोऱ्यात वावरतो. फकिरा सारखीच सत्तूची उदार, दिलदार, असत्य, अन्यायाविरूद्ध लढण्याची झुंजारवृत्ती. सरकारविरूद्ध तो निकराची झुंज देतो. सरकार हे पाहतही नाही, की त्याने खून का केला होता? एक असभ्य प्रवृत्तीवर चाल चालत होती. चौगुल्याच्या माराने सई व पोटातले मूल मेले असते. सत्तूने फार समजावले. पण त्याच्यातल्या सभ्यतेचा झालेला अपमान त्याला सहन झाला नाही. आणि त्याने कुऱ्हाड उचलली. मी खून केला नाही. दोन जिवांची हत्या करत पाहणारे पाप मी नष्ट केले. हे पुण्यकर्मच केले. पण त्याचे हे ऐकणार कोण? कायदे कानून जगाच्या लेखी हा भयंकर अपराधच होता. माणसातल्या सत्य प्रवृत्तीचा परमोत्कर्ष या कादंबरीत साधला गेला आहे.

'वैजयंता'या कादंबरीतील वैजयंता दुःखद जीवनानुभवाच्या, अंगभूत गुणांच्या, बाणेदारपणाच्या पतिव्रतेच्या निष्ठेच्या बळावर दारिद्र्याशी आणि प्रतिकूल सामाजिक परिस्थितीशी यशस्वी संघर्ष देताना दिसून येते. 'वैजयंता'च्या प्रस्तावनेत अण्णाभाऊ म्हणतात.''जो कलावंत जनतेची कदर करतो, त्याचीच कदर जनता करते हे मी प्रथम

शिकून मगच लेखन करीत असतो. केवळ कल्पनेचे कृत्रिम डोळे लावून जीवनातील सत्य दिसत नसते. ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्यानं सर्वच दिसतं परंतु ते सर्व साहित्यिकाच्या हाती येत नाही. उलट दगामात्र देतं.... माझा देशावर, जनतेवर आणि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. ''[३] माझा दावा आहे, की पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्या दलितांचे जीवन तितक्याच प्रामाणिक हेतूने निष्ठेने मी चित्रित करणार आहे नि करीत आहे. यावरून अण्णाभाऊंचा दलित माणसांच्याकडे बघण्याचा विधायक दृष्टिकोन दिसून येतो. तसेच माणसांच्या जवळ असणाऱ्या कार्यशक्तीवर विश्वास ठेऊन प्रत्येकाजवळ असणारे वास्तव लेखकाने दाखवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. 'वैजयंता' व 'वारणेचा वाघ' अशा कादंबऱ्यामधून अण्णाभाऊंनी अन्याय पीडितांची चित्रणे केली आहेत.

अण्णाभाऊंनी आपल्या कादंबऱ्यातून 'माणसानं जगलं पाहिजे' हाच संदेश दिला आहे. व तो स्वत: आचरून दाखविला. ''थोर साहित्यिकांचे एक लक्षण असे की, मानवी जीवनविषयक कोणतातरी नैतिक मूल्यभाव तो आपल्या साहित्यातून सूचित करीत असतो. अण्णाभाऊंनी दीनांच्या, पतितांच्या, भणंगभिकाऱ्यांच्या, तथाकथित दरोडेखोरांच्या अर्थशून्य मानल्या गेलेल्या जीवनात माणुसकीची अर्थपूर्णता असल्याचे दाखवून दिले. या दलित-पतित जीवन-सृष्टीतही मंगल मानवी भावनांचे नैसर्गिक मानवी विकारांचे ललित कसे रंगते, हे स्पष्ट केले. दलित पीडित जगाचा हा पहिला लेखक व भाष्यकार होय.''[४] प्रा.रा.ग.जाधव यांचे हे मत अण्णाभाऊंमधील कलावंतांची ओळख पटवून देणारे आहे.

दलित जाणिवेच्या कादंबरी लेखनाबरोबरच 'मास्तर', 'वैर', 'अलगूज', 'मधुरा', 'आघात', 'अग्निदिव्य', 'कुरूपा' 'रानबोका' वगैरे कादंबऱ्यातून सामान्यत: लोकप्रिय कादंबरीचा फॉर्म्युला त्यांनी वापरलेला आहे असे वाटते. त्यामुळे

"अण्णाभाऊंनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे."[४] हे मत मान्य करावे लागते. प्रा.गंगाधर पाणतावणे म्हणतात की, "अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा वेग व पसारा मोठा असला तरी फार थोड्या कादंबऱ्यांनी त्यांना अपूर्व यश दिले आहे. 'फकिरा' सारखी कादंबरी ते पुन्हा लिहू शकले नाहीत. हे खरे त्याचे मूळ त्यांच्या दारू (ण) स्थितीत आहे."[५] हे अण्णाभाऊ आपल्या तळपत्या प्रतिभेने त्यांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली. एका उपेक्षित जीवनाच्या आविष्काराने साहित्य क्षेत्रात अपूर्वता आणली. त्यांनी मराठी साहित्याचा मळा अधिक संपन्न केला हे कुणालाही विसरता येणार नाही.

ना.रा.शेंडे यांची 'काजळी रात्र' (१९५६) ही त्याची पहिली कादंबरी दलित जीवनाचा मागोवा घेणारी वाटते. ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर व दलित या जातींमध्ये बंधुभाव प्रस्थापित व्हावा, असा तिचा विषय आहे. मोहन हा दलित तरूण व चित्रा ही ब्राम्हणकन्या यांच्या माध्यमातून लेखकाने पुरोगामी किंवा नव्या सुधारणावादी समतावादी मूल्यांचा विचार मांडलेला आहे. त्याचप्रमाणे ब्राम्हणेतरांतील वेगवेगळ्या जाती जमातींचं एकात्मपीठ निर्माण व्हावे असेही या कादंबरीतून सूचित केले आहे. विषमता नष्ट व्हावी व समता राखली जावी. जातिभेद साफ झुगारला जाऊन दारिद्र्यात होरपळत असलेला खालचा थर उन्नत व्हावा आणि पर्यायाने ग्रामविकास साधला जावा या कल्पनेने मी साध्या कादंबरीचा देह निर्माण केला आहे असे ते म्हणतात. ब्राम्हणेत्तर व दलित यांच्या युतीने तिचा आत्मा घडविला आहे. दलित समाजातील मोहन व ब्राम्हणकन्या चित्रा यांच्या ध्येयवादाचे वर्णन या कादंबरीत पहावयास मिळते.

समाज जीवनात भावनात्मक एकता निर्माण व्हावी या विचाराने प्रेरित होऊन ही कादंबरी लिहिली आहे. अद्‌भूत अध्यात्म आणि भोगवाद त्यातील संघर्ष चितारण्यासाठी त्यांनी 'विलासिनी'(१९७८) ही कादंबरी लिहिली. या कादंबरीचा पुढचा सांधा ठरावी

अशी 'अन्शुजा' ही कादंबरी लिहिलेली आहे. कादंरबीत अतिद्रिय विश्वातील अनुभवाचे चित्रण त्यांनी केले आहे. तसेच 'तांबडा दगड' (१९५८) ही कादंबरी दलित आदिवासींच्या वन्य जमातीच्या जीवनावर लिहिलेली आहे. यामध्ये अज्ञान-विज्ञान व सूड दर्शन घडविले आहे. अशा पद्धतीने शेंडे यांची कादंबरी दलित साहित्याच्या दृष्टीने जाणीवशून्य आहे. ''त्यांच्या या लेखनाला 'कलामूल्य' नसले तरी 'कालमूल्य' थोडेफार आहे.''[६] असे म्हटले तरी वावगे होणार नाही असे वाटते.

शंकरराव खरात हे अण्णाभाऊ साठेंच्या समकालीन लेखक म्हणून यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी 'माणुसकीची हाक'(१९५७), 'हातभट्टी' (१९७०), 'मी मुक्त मी मुक्त' (१९७१), 'झोपडपट्टी' (१९७३), 'गावचा टिनोपाल गुरूजी' (१९७३), 'मसालेदार गेस्ट हाऊस' (१९७४), 'पारधी' (१९८०), 'बऱ्याची दिंडी' (१९९०) अशा कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

'वासुनाका', 'माहिमची खाडी' या कादंबऱ्या झोपडपट्टीच्या जीवनावर लिहिल्या गेल्या आहेत. पण झोपडपट्टीतील वास्तवाचे मूळ भयाण अशा सामाजिक आर्थिक विषमतेत आहे. याचा म्हणावा तितका शोध त्यातून घेता आला नाही. 'हातभट्टी' या कादंबरीतून झोपडपट्टीतील ओंगळदर्शन, त्यातील पिणारी दादा मंडळी, त्यांची अरेरावी व स्त्रियांची छेडछाड, त्यातून उद्‌भवलेले हाणामारीचे प्रसंग, पोलिसांच्या धाडी, हप्ते असे वर्णन आले असले तरीदेखील त्यात खरातांना खोल जाता आले नाही. या कादंबरीतील मुख्य पात्र म्हणजे गिरजा, तिचा नवरा नाऱ्या व सर्जादादा यांचे वर्णन सरळ आले असून त्यात नाविन्य असे काही जाणवत नाही. या कादंबरीत नाऱ्या व त्याच्या कुटुंबाचा संघर्ष दाखविला असला तरी हे सगळं घडतं ते केवळ हातभट्टीमुळे या हातभट्टीमुळे एका समूहाचा कसा विनाश होतो याचे वर्णन आले आहे. यामुळे प्रा. भालचंद्र फडके म्हणतात, ''नव्या दिशेने खरात 'हातभट्टी' लिहू शकले नाहीत एवढे

मात्र खरे त्यांची लेखणी अनुकरणातच रंजली असे वाटते.''[७] 'मी मुक्त मी मुक्त' या कादंबरीतून अनाथीत वाढलेल्या मुलाची कथा सांगतात तर 'गावचा टिनोपाल गुरूजी'ही कादंबरी शिक्षण खात्यातील भ्रष्टाचारावर लिहिलेली आहे. ही कादंबरी आपल्या शिक्षण संस्कृतीचा विषारीपणा सांगण्यासाठी लिहिली असावी असे वाटते.

'माणुसकीची हाक' या कादंबरीत शंकरराव खरात यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लक्षावधी अनुयांया बरोबर १९५६ ला बौद्ध धर्म स्वीकारला ही धार्मिक जगतात ऐतिहासिक स्वरूपाची क्रांती होती. याची प्रेरणा होऊन 'माणुसकीची हाक' ही कादंबरी लिहिली गेली. यामध्ये गावातील दलित व्यक्ती बाबासाहेबांच्या आदेशानुसार गावकीची कामे नाकारून नव्या जीवनाचा स्वीकार करतात. त्यामुळे सवर्ण चिडतात. बहिष्कार पुकारला जातो. घरे पेटविली जातात. फॅक्टरीतही कामे पत्करून ते अस्पृश्यता निवारण्याच्या आणि माणूस होण्याच्या प्रकियेत सामील होतात. आपल्या गावावर असा भयंकर प्रसंग ओढवला हे दलितातील दिनू नावाच्या मुलाला कळते. याचा जाब पाटलाला विचारावा म्हणून तो गावाकडे जातो सवर्णांच्या विहिरीवर पाणी पिण्याचा आळ घेऊन त्याला बेदम मारले जाते. तो शुद्धीवर येतो तेव्हा त्याच्या कानावर 'धम्मं सरणं' चा घोष येतो. ही माणुसकीची हाक पहिल्यांदाच त्याला ऐकायला मिळालेली असते. धम्म स्वीकारने घडलेले स्थित्यंतर सांगणारी महत्त्वाची कादंबरी म्हणून 'माणुसकीची हाक' या कादंबरीकडे पाहिले जाते.

'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबरीत शिवा महार या दलित व्यक्तीचा मुलगा आनंदा इंजिनियर होतो. सवर्णांनी आपले कुटुंबच बहिष्कृत केले आहे हे त्याच्या लक्षात येते. तो गावातून बाहेर पडतो आणि सगळी समाजरचनाच उद्ध्वस्त करण्याचा कार्यक्रम हाती घेतो. आम्ही माणसासारखे वागतो म्हणून आमच्यावर गावाचा बहिष्कार काय? नव्या युगाच्या क्षमतेचा आम्ही स्वीकार केला म्हणून आमच्यावर हा गावचा राग

काय असे अनेक प्रश्न आनंदा विचारतो. त्यावर खटला चालतो. तो खटल्यातून निर्दोष सुटतो. त्यावेळी स्वत: आनंदा न्यायालयाला विनंती करतो की मला तुमच्या कैदेतच ठेवा. या कैद्देपेक्षा समाजाची कैद भयंकर आहे.... तुमच्या येथल्या कैदेतून मी मुक्त झालो खरा पण आता दुसऱ्या मोठ्या तुरूंगात मी चाललो आहे. बहिष्कृतांच्या यातनांचे जिव्हार प्रभावीपणे मांडणारी ही कादंबरी दलित कादंबरी विश्वातील एक महत्त्वाची कादबरी होय. 'माणुसकीची हाक' आणि 'मी माझ्या गावाच्या शोधात' या दोन कादंबऱ्यातून जागृत झालेला दलित समाज व सवर्ण समाज यांच्यातील संघर्षाचे चित्रण करून दलित समाज कसा नव्या विचाराने प्रभावित होऊन जागृत झाला आहे. हे पहावयास मिळते. हेच या कादंबऱ्यांचे योगदान मानावे लागेल.

दलित साहित्याचा उदय झाल्यानंतर दलित कादंबरीकारांची दुसरी पिढी स्वातंत्र्य जवळ येत असताना जन्माला आली आणि तिची जडणघडण खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळात झाली असे म्हणता येईल. ही पिढी बौद्ध धर्मांतराच्या ऐतिहासिक घटनेला साक्ष आहे. यामध्ये बाबुराव बागूल, केशव मेश्राम व हरिभाऊ पगारे इत्यादींचा विचार करावा लागतो. बाबुराव बागूल यांची 'सूड' अत्यंत गाजलेली व नावारूपाला आलेली कादंबरी आपल्या गुण सामर्थ्याने महान कलाकृती आहे. कथानकाच्या दृष्टीने ही दीर्घकथा दलित साहित्यात आगळी महत्त्वाची अभिनव ठरावी असे कथानक असलेली आहे.

या कादंबरीची 'जानकी' (ज्वाला प्रसाद) ही मुरळीची मुलगी नायिका आहे. 'जानकी' ही परंपरेने चालत आलेल्या जातियतेत रडू निघते. कारण जानकी जरी स्त्री असली तरी देखील ती मुरळी म्हणजे देवाला सोडलेल्या एका मुरळीची लेक असते त्यामुळे तिला कसली अब्रू ? असे प्रश्न सभोवतालचे जग व तिची प्रत्यक्ष गंगू आईसुद्धा तिला म्हणते – ''गधडी तुला देवानं दिलयं काय ? त्याच्या नावानं बी रड, त्या मढयानं तुला दिलयं काय ? जमीन हाये ? जात आहे ? कुळ हाये .... हाये काय ? मिळलयं

भोरं कातडं बाजारात चालणारं, चालव, मिळव,खाय, ले नेस. अन् मग सडून मरशील''
जानकीच्या स्त्रीत्वाला सारखं दु:ख डसत असते. ती वास्तव जगण्याच्या जाळांमध्ये होरपळून निघत असते. अमानुष अशा लैंगिक अत्याचाराला बळी पडत असते. हे सर्व तिला एक मुरळीची लेक असल्यानेच त्रास सहन करावा लागतो. यामुळे ती स्वत: दु:खाने पेटून स्त्रीत्वाचा स्त्री जन्माचा सूड घेण्यास निघते. त्याचवेळी तिला वाटेत एक सात्त्विक निष्पाप मनाचे साधू पुरूष भेटतात. त्यांच्याजवळ जानकीला खरे ज्ञान होते. आणि शेवटी जीवनाचा साक्षात्कार घडतो. हरवलेलं स्त्रीत्व तिला परत मिळाल्याचाआनंद आयुष्यभर मुरळीची मुलगी असल्याने वासनेच्यालाथांनी चुरगळाळलेले जानकीचे स्त्रीपण स्वामींच्या सानिध्यात सार्थकी लागते. असे कथानक कादंबरीत आणून बाबुराव बागूल यांनी आपल्या लेखनाची निराळी छाप पाडली आहे. जिथे माणुसकी हे मूल्य सर्वश्रेष्ठ आहे. अशा आदर्श मानवतावादी मूल्यांची जोपासना या कादंबरीत केली आहे. या कादंबरीत शेवटी नव्या कथानकातून दलित जीवनाचे एक अंग देखील साकारले आहे.

हि.गो.बनसोडे यांच्या 'मुक्तिसंग्राम' (१९६९) कादंबरीमधून डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने जागृत झालेला दलित समाज विरूद्ध सवर्ण असा संघर्ष आहे. मुक्ती गावातले जागे झालेले महार मानाने जगण्याचे ठरवितात. आणि त्यातून गावातले इतर लोक व महारवाडा यात जो संघर्ष उभा राहतो. तो या कादंबरीचा विषय आहे. या कादंबरीमध्ये महार-मांगांनी धर्मांतर करून गावकीचे काम नाकारून, स्वाभिमानाने जगू लागल्यावर दलित व गावकरी यांच्यामध्ये सुरू झालेला संघर्ष रेखाटला आहे. याशिवाय बनसोडे यांनी 'उज्वला' (१९७३) आणि 'आभाळा एवढी'(१९८१) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

'युगप्रवर्तक' (१९७०) ही हरिभाऊ पगारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनचरित्रावरील कादंबरी लिहून डॉ. आंबेडकरांच्या जीवनाशी सुसंगत असणारे अनेक

प्रसंग, घटनांचा तपशील मांडला आहे. तसेच त्यांनी 'झुंजार' (१९७४) ही महात्मा फुले यांच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबरी लिहिली. 'युगप्रवर्तक' मध्ये माणूस शोधण्याऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील घटना एकत्र करून लिहिली आहे. ज.वि. पवार याची 'बलिदान'(१९७०) ही लघुकादंबरी असून एका दिवसात ज्या घटना घडल्या त्याचा वृत्तांत या कादंबरीत सुंदर पद्धतीने मांडला आहे. एका प्रेतयात्रेने कादंबरीच्या कथानकाला सुरूवात होते. ही प्रेतयात्रा जगण्याची असून समाजातील गटबाजी, राजकारणात त्याची हत्या झाली आहे. त्यातच त्याचे सर्वस्व नष्ट होते. या कादंबरीत पवार यांनी दलितांच्या दु:खाबरोबर गटबाजीमुळे उद्ध्वस्त होणारे दलित जीवन सुंदर पद्धतीने रेखाटले आहे. या कादंबरीचे परीक्षण करताना राजा जाधव म्हणतात - ''बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर चळवळीत जे शैथिल्य आहे. जनता व पुढारी यांच्यात जे अद्वैताचे वातारवरण निर्माण झाले, जनसामान्य माणसांची जी कुतरओढ चालू झाली, गरिबांचे कसे हाल होऊ लागले याचे अत्यंत प्रभावी चित्रण पवारांनी आपल्या कादंबरीत रेखाटले आहे.''[८]

'हकिकत आणि जटायू' (१९७२) ही केशव मेश्राम यांची कादंबरी असून 'हकिकत' ही केशव मेश्रामांची आत्मकथा आहे. हकिकतमध्ये दलितातील व्यक्ती जीवनाचा अनुभव कथन केला आहे. भारतातील विषमतामूल आर्थिक सामाजिक व्यवस्थेने माणूस म्हणून माणसाची किंमत न देता त्याचा मानभंग, अपमान, छळ, उपेक्षाच केली जाते. माणूसपण नाकारले गेलेल्या दलित व्यक्तिचे जीवन कसे कुरतडले जाते याची लेखकाने आपल्या पूर्वाआयुष्यातील आठ दहा वर्षांच्या काळातील हकिगत यांचे वर्णन केले आहे.

लेखकाने आपल्या वाटचालीत घेतलेले शारीरिक श्रम, काबाड-कष्ट, त्याच्या लहानपणाची सामाजिक स्थिती या कादंबरीतील अनेक प्रसंग व स्वानुभवातून घडलेले

व्यक्तिमत्व असे अनेक घटनाक्रम यात आलेले आहेत. केशव मेश्राम यांच्या वाट्याला आलेले अनेक बरे वाईट प्रवाह मनामध्ये धडका मारतात. स्वत:मध्ये अनेक माणसांना पाहतोय. लेखक कधी एकदम नवा वाटतो. तर केव्हा आदिपुरूषाइतका जुनाट महात्माच्या मृत्यूची वार्ता ऐकणारा कुणाच्या पॅन्टच्या खिशातून आणलेल्या चपात्या, प्रवास, भिवांच्या घरी जातीने महार ठरलेला, बालपण लोककला लटकण्यात, ऑफिसच्च्या खुर्चीत पोक काढून कसरीसारखा कागद कुरतडण्यात तारूण्याचा दहिकाला झाला. असे अनेक प्रसंग वाचकाला अस्वस्थ करून सोडतात. हकिकत मध्ये केशव मेश्राम यांनी सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे समाजातला एक फार मोठा समूह पशुपेक्षाही हीन दर्जाच्या जीवनाला सामोरा जातो आहे हे दाखवून दिले आहे. असे अनेक प्रसंग वाचकाला अस्वस्थ करून सोडतात. अशातील एक तरुण मुलगा संवेदनशील मन 'माणूस' म्हणून जगण्याचा आपला हक्क प्राप्त करू पाहतो आहे. पण इथली विषम समाजव्यवस्था त्याच्या स्वप्नाला यशस्वी होऊ देत नाही. या समाजव्यवस्थेविरूद्ध तो मुलगा संघर्षाचा पवित्रा घेतो याचे वर्णन या कादंबरीत आले आहे.

'जटायू' ही प्रतिकात्मक स्वरूपाची कथा आहे. निर्बलांचे प्राणरक्षण करण्यासाठी स्वत: रक्तबंबाळ होणाऱ्या रामायणातील - 'जटायू' ची प्रतिमा वापरल्याने अत्यंत सूचक,परिणामकारक झाली आहे. प्रतिमाच्या वापरांमुळे मेश्राम यांच्यातील कल्पकतेची, एका कलावंताची दृष्टी प्रत्ययाला येते.

वऱ्हाड या परिसरातील दलितांची 'सिद्धार्थनगर'नावाची धेडपुरा म्हणून ओळखली जाणारी वस्ती. या वस्तीत राहणाऱ्याा भावजी मांगाच्या 'अभिमन' चे भावविश्व या कादंबरीत मांडलेले आहे. कष्टाळू व स्वाभिमानी आई वडिलांच्या संस्कारात वाढलेल्या एका वेगळया सामाजिक वातावरणात वावरणाऱ्या अभिमनचे मन नवे वारे प्यालेले जागृत झालेली सामाजिक जाणीव बाळगणाऱ्या मनात पुढे जाण्याच्या

वादात आकांक्षा व उर्मी असतात. अभिमन मॅट्रिकची परीक्षा पास झाल्याने घरात आनंदी आनंद, पण समाजात मात्र गौरव दुसऱ्याचा. यामुळे तो दु:खी होतो. अशातच उर्मिला दामलेशी त्याची जवळीक होते. पण यामध्ये स्वत:ला गुरफुटून न घेता तेवढ्या पुरतीच जवळीक करतो. यावरून अभिमनची तटस्थता पहावयास मिळते. त्या कादंबरीतील मुख्य प्रसंग म्हणजे अन्जाबाबाची एका भूतबाधा झालेल्या निर्मलाबाई नावाच्या तरूण विवाहित मुलीच्या संबंधाने अभिमनची बाबांच्या कुकृत्यात गोवणूक होते.

'हकिकत आणि जटायू' या कादंबरीच्या संबंधी भालचंद्र फडके म्हणतात की, "'हकिकत आणि जटायू' या दोन कादंबरिका म्हणजे प्रा. केशव मेश्राम यांची मराठी कादंबरीला महत्त्वाची देणगी आहे."[९]

तसेच त्यांच्या 'पोखरण'(१९७९) या कादंबरीत मुखिया जमातीने पकडून आणलेल्या गोऱ्या बुडग्याविषयी खल करण्यासाठी आदिवडाजवळ पंचायत भरलेली असते. तेव्हा जमाली जमातीला सांगत असतो. "हा बुडगा वेगळा आहे. त्याचे हात, पाय, स्नायू पाहिले तर त्याने कष्टाची कामे कधीच केली नाहीत असे वाटते. आमच्या छोटया शिवाणीसारखे नाजूक स्नायू त्याच्याजवळ सापडलेली हरण कातड्यांची बदं गाठोडी मी पाहिली होती. मंडिक, बाप्पा, जागोबा, शंबर, दण्डक या साऱ्यांनी ती बघितली आहेत. काही पानावर आकृत्या आहेत. लिहिलेले काही शब्दच आपल्या शब्दासारखे दिसतात. सूर्याचे चित्र आहे. अनोळखी प्राणी आहेत. आपल्यातल्या काही पोरांनी तेही शिकले पाहिजे. आमच्या नातवा-पंर्तवंडाना जर पुढे जायचे असेल तर हे नवे शिकलेच पाहिजे असे विचार 'पोखरण' या कादंबरीत व्यक्त केले आहेत."

सुधारक गायकवाड यांनी 'शूद्र'(१९७७) या कादंबरीत नागनाथाचे भावविश्व चित्रित केलेले आहे. नागनाथ या कादंबरीचा नायक शुद्र हा परंपरेने लागलेला कलंक पुसून टाकण्यासाठी घराबाहेर पडतो. तहाणेने कासावीस झाल्याने नागनाथ ऋषी-

आश्रमाच्या जवळ असणाऱ्या झऱ्याकडे जातो त्याचवेळी वाटेत त्याला एक ब्राम्हण ऋषी कन्या भेटते. ती त्याला ऋषीने मना केल्याप्रमाणे ऋषी कन्या नागनाथला पाणी पिण्यास विरोध करते. 'अरे ये शुद्रा' म्हणून ती त्याला हिणवते. त्यामुळे नागनाथला राग आल्याने तो आपली रागाने क्रोधिष्ट झालेली नजर तिच्यावर पाडतो. तेव्हा ती तुच्छतेने त्याचा अपमान करते. आणि म्हणते की, "अरे ये शुद्रा ! असे का पाहतो आहेस ? ब्राम्हणावर डोळे रोखले तर शुद्र व्यक्तिंचे डोळे फोडले जातात. हे तुला माहित नाही काय ? मी सहज झाडीत पाऊल टाकले तर पाने बाजूला सारून फुले माझ्याकडे टकमक पाहतात आणि तू डोळयात लाल विस्तव टाकून क्रोधाने पाहतो आहेस? मी फक्त शब्द थुंकला तर तुझे शीर धडावेगळे केले जाईल. तरी मी तुला क्षमा करते... त्या झऱ्याचे पाणी फक्त आमच्यासाठी आहे. त्याला तुझे पापी बोट लावून ते विटाळू नकोस. येथून तू लवकर चालता हो ."[१०] असा अपमान झाल्याने रागाने पेटून उठून सुडाने द्वेषाने तिच्या गालावर चुंबनाचा वर्षाव करतो त्यामुळे ऋषीकन्येची किंकाळी ऐकून आश्रमातील ऋषीगण माणसे येतात. यावेळी त्यांच्यामध्ये संघर्ष होतो. त्यामध्ये नागनाथ धनुष्य बाणाने या सर्वांना ठार मारतो. "आपल्या स्पर्शाने हिच्या आयुष्यावर पापाची एखादी रेषा उठली नि क्षणभर का होईना, आपणासारखी मन पोखरणारी अस्पृश्यतेची वेदना तिला अनुभवावयास लावली तर आपण धन्य होऊ!"[११] या कादंबरीच्या शेवटी शुद्र हा कलंक पुसण्यासाठी तो मनाने विजयी होतो. या कादंबरीचा शेवट अत्यंत कारूण्यपूर्ण सूचक व वेधक असाच आहे.

विजय सिरसट यांनी 'कालगर्भ' (१९९०) या कादंबरीतून पुढारपणाच्या नादापायी दलित तरूण आपल्या जीवनाची कशी दुर्दशा करून घेत आहेत हे दाखविले आहे. महार-मांग या जातीतील वैमनस्य, त्याचा फायदा घेण्याची वृत्ती सवर्णाचे अंतर्गत वाद

आणि दलित शक्तीचा होणारा गैरवापर या सर्व बाबींचं लेखकाने उत्कृष्ट चित्रण केले आहे.

'झळ' (१९८०) या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी परिस्थितीने पिडलेला दलित समाज, त्यांच्या जीवनाला मिळणारे चारी रस्ते बंद झालेले आहेत. त्यामुळे तो चोरीसारख्या वाम मार्गाला लागताना दिसतो. शोषितांच्या आधारहीन जीवनाचा उच्चभ्रू लोकांनी उपभोग घेतलेला आढळतो. या कादंबरीचा नायक 'शेशू' हा घरची परिस्थिती गरिबीची असून देखील त्याच्यावर मात करीत कधी कष्ट करून तर कधी उपाशी राहून शिक्षण पूर्ण करतो. अशी ही कादंबरी दलितांच्या शोषित जगाचे, फाटक्या जीवनाचे चित्रण कादंबरीकार 'झळ'या कादंबरीत करतो. बाबुराव गायकवाड यांची 'आग'(१९९६) ही दुसरी कादंबरी 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ' या कादंबरीच्या लेखनास निमित्त झाली. 'मधू' हा या कादंबरीचा नायक दलित व दलितेतरांमध्ये निर्माण झालेल्या तणावांचे व परस्पर संबंधांचे चित्रण लेखकाने जातियतेचा बागूलबुवा न दाखवता डोळसपणे व संवेदनशील प्रकृतीने केलेले आहे. महारवाडा, मांगवाडा व चांभारवाडा या तिन्हीही वाड्यात स्वत:च्या मालकीची शेती नाही अशी खंत व्यक्त केली आहे.

लोक सुशिक्षित झाले तरी अजूनही स्वतंत्र विचार न करता नेत्यांच्यामागे मेंढरांसारखे जातात. भारतीय जनतेच्या जातीयवादी संघर्षाचे मूळ यांतच आहे. महार, चांभार व मातंग अशी दलितांमध्ये दलितांमध्येही वर्गवार केल्याची मधुला चीड येते. याला दारिद्रय व निरक्षरता हेच कारण होय. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या वेळी सवर्णांनी दलितांच्यावर अन्याय केला. दलित आणि दलितेतर समाज यामध्येच केवळ परस्पर विद्वेषाची भावना नसून ती दलित समाजाच्या विविध जाती-जमातीमध्येही तितकीच उग्र स्वरूपात पहावयास मिळते. याचेही चित्रण या कादंबरीत येते.

'अजून उजाडायचं आहे' मधून माधव कोंडविलकर यांनी गावकीच्या कामात रात्रदिवस राबणाऱ्या देवजी चांभाराच्या दु:खाचे प्रसंग मांडले आहेत. हे जरी दृश्य कथानक असले तरी देवजीचे कुटुंब, देवजी आणि चांभार जातीची जातपंचायत हाही कथाभाग आलेला आहे. या कादंबरीचे कथानक हे कोकणातील राजापूर जवळील पातेपिळवली गावात घडले आहे. या गावात चांभारांच्या दोन घरांचे वर्णन येते. त्यातून त्यांच्या वैरत्वाचे दर्शन घडते. तसेच त्यामध्ये देवजीच्या लहानपणातील शिक्षणाविषयीचा आणि वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आयुष्याला चिकटलेल्या धंद्याविषयीचे चित्रण दिसून येते. चांभार जातीतील कामाचा त्रास आणि त्यातून मिळणारा कमी मोबदला ही बघण्या वेगळी दृष्टी या कादंबरीत पहायला मिळते. देवजीचे घराणे हे मूळचे या गावचे नसून या गावाने गावाला चांभार पाहिजे म्हणून आणून ठेवलेले आहे. या उपरेपणामुळे देवजीला सणावारात मानसन्मान मिळत नाही. चांगले बोलून आणलेल्या देवजीच्या आजोबाला गावकरी फसवतात. जमीन, घर बांधून देतो असे सांगतात, पण ते काहीही देत नाहीत.

तर 'अनाथ'(१९८१) या कादंबरीत भास्करने शिक्षणासाठी केलेल्या धडपडीची आणि बेकारीमुळे निर्माण झालेल्या वैफल्याची कथा चित्रित केली आहे. तर 'छेद' मध्ये (१९८२) दलित समाजातील प्रा. सुधीर भंडारे आणि त्यांची विद्यार्थिनी यांच्या प्रेमकथेतून दलित जातींमधील भयावह उच्चनीचता लेखकाने वर्णिली आहे. प्रसंगी सवर्णांनी उदार भूमिका घेतली तरी दलितांचे आपापसातले भेदच त्यांना मानसिक गुलामगिरीतून फक्त होऊ देत नाहीत ही विदारक वस्तुस्थिती कोंडविलकरांनी या कादंबरीच्या माध्यमातून दाखवून दिली आहे.

'नकुल'(१९८१) या कादंबरीत माधव कसबे यांनी पाटलाचा अनौरस मुलगा नकुल गावातील दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी झटतो. मराठा जातियवादाविरूद्ध

दलितांनी दिलेला लढा असे या कादंबरीचे स्वरूप आहे. 'हाडकी हाडवळा' (१९८१) मधून नामदेव ढसाळ यांनी बलुत्याच्या अनुषंगाने सामाजिक विषमता दाखवून दिली आहे. बायजा ही एक दलित स्त्री कादंबरीची नायिका आहे. सायब्या तिचा धनी. गावातील मेलेली ढोरं ओढून गावकुसाबाहेरील ज्या ठिकाणी फाडली जातात त्या जागेला 'हाडकी हाडवळा' म्हणतात. येसकराची काठी एका वर्षाकरीता महारांच्या घरी आल्यानंतर त्या वर्षात दलित माणसांचे गावातील चातुर्वण्य व्यवस्थेची सवर्ण व्यक्तींशी नाते कसे जोडले जाते. त्यामध्ये त्या व्यवस्थेच्या जात्यात दलित माणसे कशी भरडली जातात याचे वर्णन हाडकी हाडवळामध्ये आलेले आहे. हाच या कादंबरीचा मुख्य गाभा आहे. प्रत्येक वर्षी पडणाऱ्या पावसामुळे अनेक वर्षापासून दारिद्रय ज्यांच्या वाट्याला आलेले आहे. या कादंबरीची नायिका बायजा हिच्या माध्यमातून नामदेव ढसाळ यांनी ही कादंबरी लिहिली. म्हणून स्वत:चे नाव लावले. असा लय करण्याचा प्रसंग दाखविला आहे. श्रावण मास्तर महार मांगावर होणाऱ्या अन्यायाला तोंड देताना दिसतो. रक्तपिती झालेल्या सवर्ण सखा गावडेचा झालेला मृत्यू, त्याच्या भावकीने दिलेला नकार, बायजाला ते प्रेत उचलण्यासाठी केलेली सवर्णांची दमदाटी व बायजाने घातलेली अट यातून झालेला पेच या साऱ्यातून लेखकाने सवर्ण माणूसही खुद्द आपल्या माणसाची कशी हेळसांड करतो, अशा ठिकाणी दलितांची अवस्था तर काय होत असेल ? असा प्रश्न उभा केला आहे. दलित मुलांनी मास्तरांनी आखून दिलेल्या जागेत बसूनच शाळेच्या आवारात शिकायचे. वाहत्या नदीच्या वरच्या बाजूला मराठयांनी आणि खालच्या बाजूस महारांनी पाणी भरायचे किंवा धुणे धुवायचे असे प्रसंग ढसाळ यांनी लिहून भारतातील समाजव्यवस्थेमधील जातीचे वर्णन केले आहे. मनबाला पोटच्या मुलासारखी जपणारी बायजा मनबा हा बायजाचा धाकटा दीर असून यांच्या मनात बायजाविषयी वासन होऊन मनबा तिचे सौंदर्य आणि तिचा नग्न देह रात्रीच्यावेळी दारातून न्याहाळत असतो. एक

दिवशी वेळ साधून मनबा बायजावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. संतापाने बेभान झालेली बायजा मनबाचा बदला घेण्याचे ठरवून त्याला बेदम मारते.

बायजा ही आपला धाकटी दीर मनबाकडे जिव्हाळ्याच्या भावनेने, मायेने पाहत असते त्या चांगल्या भावनेने मनबा पाहत नाही. तर वाईट दृष्टीनेच पाहत असतो. मनबाच्या विकृत मनोवृत्तीचे, स्त्रीत्वाची विटंबना करणाऱ्या प्रवृत्तीचे ढसाळांनी वर्णन या कादंबरीत केले आहे.

तर त्यांच्या 'निगेटिव्ह स्पेस'(१९८७) या दुसऱ्या कादंबरी मधून नामदेव ढसाळ यांनी 'राजा' या पात्राच्या माध्यमातून आंबेडकरी विचाराला पाईक म्हणून समोर आलेला दिसतो. त्याचे वडील नाथार्डी कामगार मुकादम धान्याच्या गोडावूनमध्ये कामाला होते. तिथे अंगावर पोती कोसळून त्याखाली मरण पावतात. नवऱ्याच्या मृत्यूच्या धक्याने त्याची आईही मरते. येथून राजाच्या शोकांतिकेला सुरूवात होते. त्यानंतर राजा गुन्हेगारी जगात सामील होतो. फाळणीच्या आगीत मुमताजला सापडलेली जैनी मुमतरव ईस्माईलचा आधार घेते पण ईस्माईल हा वेश्या व्यवसायातील असल्याने मुमताजची साथ घेऊन जैनीला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडतो व स्व: ही जैनीच्या सौंदर्याचा लयलुट करतो. जैनीला एम.ए. होऊन तिला प्रबंध लिहायचा होता पण इस्माईलने तिच्यावर अन्याय करून तिची सर्व स्वप्ने धुळीला मिळवली. 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबरीतून लेखकाने गुन्हेगारी विश्व उभे करून कम्युनिस्ट आणि आंबेडकरी विचार, कार्य यातील साम्यभेद यांची चर्चा घडवून आणली आहे.

उत्तम बंडू तुपे यांनी 'झुलवा' (१९८६) या कादंबरीमधून देवदासींच्या जीवनातील दु:ख व्यक्त केले. थोडंफार शिकून नर्स व्हावं एवढीच माफक आकांक्षा असलेल्या जगनला प्राप्त परिस्थितीत जोगतीण व्हावं लागलं. देवदासीच्या जीवनावरील स्वत:च दु:ख प्रकट करताना म्हणते, 'आये, तुझी यल्लमा घाल हागणदारील ! तिनं तर आपल्या

जलमाचा नास केलाय .... हे सगळं कशासाठी ग करायचं? तुझ्या सांगण्यापरमाणं कारण करून घिटलं. जोगतीण झाली, झुलवा लावून घी म्हणाली ते बी केलं. तरी कुठं पायाखाली घर घावंना. सारखं कुणावरच्या दोडक्यागत आतराळी वाऱ्यावर झुलत ऱ्हायचं, काय हाच हा जोगतिणीच्या जलमात? माणूस म्हणून तरी कुणी बघतयं आपल्याकडं ? जगणच्या बोलण्यातून अतिवेदना आणि असह्य दु:ख व्यक्त होते. तसेच उत्तम तुपे यांनी 'चिपाड' (१९८४), 'भस्म' (१९८१) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

अशोक व्हटकर यांनी 'मेलेले पाणी '(१९८२) या कादंबरीमधून ढोर जाती बरोबरच महार, मांग, चांभार या गावाबाहेरील दलित जातींचे वर्णन आले आहे. या कादंबरीत कोणतीही एक व्यक्ती अगर कुटुंब केंद्रस्थानी आहेत. गावकुसाबाहेरील दलितांचा व्यवसाय त्यांची कौटुबिक परिस्थिती त्यांच्यातील श्रेष्ठ कनिष्ठपणा, त्यांच्या व्यवसायातील परस्परसंबंध, गावातील राजकारण व यामधून होणारा दलितांना होणारा त्रास अशा अनेक अंगाने कथानक आकार घेते. 'मेलेले पाणी' या कादंबरीत मानाने मेलेल्या उपेक्षित जाती-जमातींचे, संघर्षाचे, त्यांच्या दारिद्रय वेदनांचे वर्णन करून ढोर समाजातील लोकांचे जीवन कसे व्यतीत करतात याचे वर्णन केलेले आहे.

तसेच 'त्यांची ७२ मैल'( १९८९) ही आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिली आहे.

बा.स.हाटे यांनी 'युगविधान'(१९८३) , व 'युगंधर'(१९८८) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'युगविधान' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या प्रेरणांची गुंफण करणारी कादंबरी आहे. माणुसकीचे हक्क कोणी देत नसतात ते संघर्ष करूनच मिळवावे लागतात. माणुसकीचे अपहरण झालेले लोक माणुसकीच्या पुन:स्थापनेसाठी महासंग्राम सुरू करतात. या महासंघर्षाचे चित्रण या कादंबरीत आले आहे. आम्ही नागवंशीय लोकच या भूमीचे पुत्र आहोत. आणि इतर सर्व बाह्य आहेत. 'युगविधान' मधील अनेक घटना सत्य असून त्या घटनांना एकत्र

सांधण्यासाठीच केवळ कल्पनेचा आधार घेतलेला आहे. या कादंबरीत एका समूहमनाचे चित्रण असल्यामुळे या कादंबरीचे कथानक कादंबरीत १९२७ ते १९५६ या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

उत्तम कांबळे यांच्या 'श्राद्ध' (१९८६) या कादंबरीमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत जेव्हा शरणगुपी गाव आत्ममानाने जागा होऊन मेलेली ढोरं ओढायचं महारांनी नाकारले, सवर्णांना जोहार घालण्याचे ही बंद केला. सांगावा पोहोचवण्याचे बंद केल्याने स्पृश्य लोकांना याचा राग येऊन दलितांना त्रास देतात. या कादंबरीतून फुले आंबेडकरांच्या विचारांची जागृती झालेल्या दलित समाजामनाचे वर्णन आले आहे.

'घराणं तमासगिराचं' या कादंबरीत शशिकांत तासगावकर यांनी तमाशा करून पोट भरणाऱ्या एका घराण्याची कैफियत मांडण्याचे काम केले आहे. एक काळ असा होता की, या घराण्याच्या तमाशामुळे नावलौकिक झाला होता. अशा घराण्यातील आजचे वंशज आबा, जाना, आणि अण्णा हेही तमाशात आहेत. आज त्यांच्या वाट्याला जे काही दु:खद जीवन वाट्याला आले आहे त्यांचे चित्रण तासगावकरांनी केले आहे.

या दु:खाला ते जसे जबाबदार आहेत तसे त्याहूनही अधिक इथली जातीव्यवस्था, आर्थिक विषमता आणि आज संकटात सापडलेला तमाशा व्यवसाय ही कारणे आहेत. बखर साधे वाटणारे घटना, प्रसंगही लेखक कलात्मक पद्धतीने मांडतो आणि त्यातून आशय अधिक सधन बनवितो. तमासगीर गावांनी जिभेचे चोचले भागविण्यासाठी तान्या कोल्हाट्याला डुक्कर कापायला लावणे, बाकीच्या खर्चासाठी वर्गणी काढणे आणि नंतर दारू पिणे या साध्या प्रसंगातून लेखक तमासगिरांच्या कलंदरपणा दाखविण्याची कलागत करत आहे. कादंबरीत तमासगिरांच्या विवाहबाहय लैंगिक संबंधाचे चित्रण येते. त्या

चित्रणात लेखक पारंपरिक पद्धतीच्या रचनेला फाटा देतो. यामध्ये कुठेही रंजकपणा व भडकपणा आणू देत नाही. यावरून तमासगिरांच्या खऱ्याखुऱ्या जीवनाचे दर्शन घडते. कादंबरीचे कथानक साखळी पद्धतीने घडत नाही. या सगळ्यांतून तमासगिराचे कथानक आकराला येते.

योगेंद्र मेश्राम यांच्या 'माझं गाव कुठाय?' या कादंबरीत दलितांनी जुने किळसवाणे जीवन धिक्कारून नवे मानवतावादी जीवन स्वीकारले. दलितांकडून बुद्धाकडे प्रयाण केले या कादंबरीतील बापू कांबळे हा शिकलेला असल्याने जुन्या रूढी तोडल्या पाहिजे. म्हणून त्यानी वाडवडील पूजत असलेले घरातले सगळे देव तळ्यात नेऊन टाकले. मेलेलं ढोर ओढून नेणे बंद केले असे या कादंबरीत वर्णन येते. या कादंबरीचा नायक चेतन आपलं गाव, माणसं सुधारण्याचा, त्यांच्यात नवे आत्मभान पेरण्याचा प्रयत्न करतो.

'जातीला जात वैरी' (१९९०) कादंबरीत ना.म.शिंदे यांनी ढोर-चांभार यांच्यातील उच्च-नीचता दाखवून चांभार-ढोर या दोन जातींचा व्यवसाय कातड्यांशी संबंधित आहे. ढोर ही कातडी कमविणारी जात तर चांभार ही चपला बनविणारी जात. ढोर-चांभारात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. ढोर आपल्या नेहमीच्या भांडयातून चांभाराला पाणी ही देत नाही. असे दलित जाती अंतर्गत उच्च-नीचता दाखविली आहे.

पांडुरंग कदम हयांच्या 'कृष्णपक्ष'(१९९१) या कादंबरीमध्ये नायकाचा 'तो' या सर्वनामाचा वापर केला आहे. भगवान गौतम बुद्धाचा धर्म स्वीकारलेल्या दलित तरूणाच्या शोकाकुल आयुष्याची कथा यामध्ये मांडली आहे. मुंबईच्या एका बकाल झोपडपट्टीत पावसाळ्यात होणारे हाल आपापल्या गावातून पोट भरण्यासाठी कचरा गोळा करतात पडेल ते काम करण्यासाठी जगण्याची ओढ होऊन मुंबईत आलेली ही माणसे शहराच्या केरकचऱ्याचाच भाग बनून जातात. आत्मसन्मान व अस्तित्व टिकविण्यासाठी लागणारे अर्थबळ नसलेली माणसे दिसतात. त्यामुळे त्यांच्या वाट्याला, आलेल्या

दु:खाच्या अनेक प्रसंगांना तोंड देताना पाहावयास मिळतात. ही कादंबरी तरूणाच्या आणि अभावग्रस्त परिस्थितीतील तरूणांच्या सर्वच जागल्या मुलांची व्याकुळ करणारी कादंबरी आहे. नामदेव कांबळे यांनी 'राघववेल', 'उनसावली' आणि 'सांजरंग' या तिन्ही कादंबऱ्यांचा आत्मचरित्रात्मक कांदबऱ्या म्हणून यांचा उल्लेख करता येईल. लेखकांनी एकच कथा या तीन कादंबऱ्यामधून मांडली आहे. या तीन कादंबऱ्या केंद्रस्थानी वालंबीचे कुटुंब आहे. या कादंबरीमधून वालंबी आणि रघू या दोन मुख्य व्यक्तिरेखांचे वर्णन या कादंबरीमधून येते.

'राघववेल'(९३) मधून रघूचे पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंतच्या काळाचे चित्रण येते. 'ऊन सावली' मधून रघूचे महाविद्यालयीन आणि सीतारामाचे अकरावी-बारावीपर्यंचे शिक्षण पूर्ण होते याचे वर्णन येते. तर 'सांजरंग' मध्ये रघू आणि सीताराम नोकरीला लागतात. तसेच मनाला चटका लावून जाणारे मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे वालंबीचा मृत्यू होतो याचे चित्रण या कादंबरीमधून झालेले आहे. नामदेव कांबळे यांनी या कादंबऱ्यामधून मांग समाजातील त्यांचा व्यवसाय त्या समाजातील श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा, सवर्णाबरोबरचे त्यांचे संबंध, महाविदयालयीन वातावरण, होस्टेलमधील अनुभव याचे चित्रण केले आहे. असे अनेक कथाभाग यामध्ये आलेले दिसून येतात. 'राघववेळ'मध्ये मांग समाजात जन्मलेल्या आणि विधवेचं जीवन जगत असताना आपल्या मुलांबाळांचे सुखदु:ख टिपणाऱ्या आणि स्वत:च्या मनाशी संवाद साधून समाजाकडे स्वस्त दृष्टीने पाहणाऱ्या एका धीरोदात्त स्त्रीचे चित्रण केले आहे. आशयाच्या अंगाने तर कादंबरीची रचना सशक्त आहे. पहिल्यांदा वऱ्हाडी भाषेला भारतीय स्तरावर पोहोचवण्याचे कार्य नामदेव कांबळेनी केले आहे. या कादंबरीचा आरंभच भुकेच्या ऋचेने झालेला आहे.

भीमसेन देठे यांच्या 'इस्कोट' या कादंबरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि धर्मांतराच्या डोळस कृतीने समाजाच्या बदलेल्या दृष्टीचे प्रत्यंत्तर आले आहे. बौद्ध झालेल्या व्यक्तींचा खेड्यापांड्यातून छळ होऊ लागला. हा अपमान तरूणांना सहन होत नव्हता. अशा तरूणांच्या मनाची झालेली अवस्था या कादंबरीत दाखविली आहे. वडगांवच्या महारांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर गावातील सवर्ण लोक त्यांच्याकडे वेगळ्या भावनेने पाहतात. गावच्या भैरूनाथाच्या यात्रेच्यावेळी काम करण्यासाठी महार लोक नकार देतात. त्यावेळी गावच्या पाटलाला व सरपंचाला राग येतो. महार लोकांना वठणीला आणण्याचा बेत करतात. तसेच या कादंबरीत आणखी एक कथानक आहे. महाराचा मधू व ब्राम्हणाची मेधा याचं लग्न होऊन मेधाला दिवस जातात. मुंबईमध्ये घडलेली ही गोष्ट वडगावांत कळते. सगळ्या महारांचा सूड घ्यायचा म्हणून सरपंच, पाटील व मेघाचे वडील आप्पा ठरवितात. ज्यांनी आजचं शिलं तुकडं खाऊन, पोटं भरलीत. त्या म्हारांची एवढी गजल? आप्पासारख्या बामणाची पोर खुशाल एक महाराचा पोर पळवून नेतो काय आणि त्यांच्या पोटचं तिला प्वार होतं काय त्याचा यांना राग येऊन आताच्या आता सारा म्हार वाडाच पेटवून टाकू ! एका एका म्हाराला चेचलून मारू असे वर्णन या कादंबरीत आले आहे. हलक्या जातीतील लोकांनी आपल्या बरोबरीला येऊ नये अशीच सवर्ण यांची दृष्टी असल्याचे जाणवते. त्यांच्या 'चक्री' (१९९८) या दुसऱ्या कादंबरीत भीमसेन देठे यांनी रांजणगावातील आगी महाराच्या पोटी आलेल्या 'दगडींच्या जीवनाचे चितावणारी कादंबरीत वर्णन केले. दौलत हा चळवळीत काम करणारा कार्यकर्ता दिसतो. याबरोबर दलित चळवळीत चाललेले गटातटाचे राजकारणाचे पडसाद उमटले आहेत.'

'रमाई' (१९९७) ही कादंबरी बंधु माधव यांनी आंबेडकरांच्या जीवनावर आधारित लिहिली आहे.

बाबुराव बागूल यांनी 'सूड' या कादंबरीनंतर 'कोंडी' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीत अनेक स्वभावाची, प्रवृत्तीची विचारांची माणसे आलेली आहेत. या कादंबरीचा नायक पावन हा सुशिक्षित, ध्येयवेडा, परिवर्तनाचा ध्यास घेतलेला, आंबेडकरी विचारांनी भारावलेला तरूण आहे. त्यांच्या प्रतिभेवर भाळलेली, विचाराला एकरूप झालेली, खांद्याला खांदा लावून लढणारी त्याची पत्नी सुशिला दिसते. पुस्तकात रमणारा आणि समाजाचा विचार करणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्चात समाजात माजलेल्या दुहीचे, गटबाजीचे पावनला दु:ख वाटते. त्याच्यातील क्रांतीकारी मन त्याला स्वस्थ बसू देत नाही. समाज एकसंघ करण्यासाठी दलितांमध्ये एकजूट निर्माण करण्यासाठी पावन स्वत:च्या स्वप्नांना मूठमाती देऊन समाजकार्याला परिवर्तनाच्या चळवळीला झोकून देताना पहावयास मिळतो. पावन हा मुंबईमधील लेबर कॅम्पात जाऊन तेथील परिसर अनुभवतो आणि त्या माणसामध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतो. काळोख्याचे कैदी असलेल्या महानगरीचा झोपडपट्टीतील लोकांच्या बकाल जीवनात प्रकाश पसरावा हे पावनचे ध्येय आहे. पावन हा यंत्रयुगाचे पत्रापासून स्वागत करणारा विज्ञाननिष्ठ तरूण आहे.

पावन मुंबईमधील लेबर कॅम्पात चळवळ उभारतो. तेथील लोकांना संघटीत करून झोपडपट्टीत सुधारणा घडवून आणतो. तेथील मोर्चे याद्वारा तो लोकांमध्ये जागृती घडवतो. अन्यायाला प्रतिकार करतो. लोकांनी सुधारले पाहिजे. मतभेद विसरावे, गटबाजीचे राजकारण सोडावे यासाठी पावन जीवाचे रान करतो. माणसाला पशुतुल्य ठरविण्याऱ्या समाजव्यवस्थेविरूद्ध लढण्यासाठी अस्पृश्यामध्येही 'अबिलीटी' 'एफिशियंशी' आहे हे सिद्ध करण्यासाठी धर्म आणि संस्कृती कडून माणसाचा सूर्य आणि पृथ्वीच्या पुत्रांवर होणारा अन्याय, अत्याचार निपटून काढण्यासाठी, त्यांच्यातील

अस्तित्व जागण्यासाठी पावन कृतिशील कार्यकर्ता म्हणून पावले उचलतान, वारंवार दिसतो.

पावन हा माणसांवर प्रेम करणारा, समूहाचा प्रतिनिधी आहे, प्याला म्हणूनच माणसाचा, माणुसकीचा अपमान सहन होत नाही. ''माणूस क्रांतीकारी झाला पाहिजे, शोषणाविरूद्ध लढला पाहिजे त्यासाठी हे क्रांती, ये, या लोकांना तुझे दर्शन दे.''[१२] अशा तऱ्हेने 'कोंडी' या कादंबरीमधून बाबुराव बागूल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरी विचाराचा दलित समाजातील दुही कमी करण्याचा त्याने केलेला प्रयत्न दाखविले आहेत.

'आता उजाडेल' (२००१) ही माधव कोंडविलकरांची कादंबरी असून त्यामध्ये महार जातीतील एक होतकरू मुलगा प्रा.सुधीर भंडारे आणि चांभार समाजातील विद्यार्थिंनी नलिनी यांच्या प्रेम कथेतून दलित जातीमधील भयावह उच्चनीचता लेखकांने वर्णिलेली आहे. सवर्णांनी उदार भूमिका घेतली तरी दलितांच्या आपापसातील भेदच त्यांना मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ देत नाहीत. यात सुशिक्षित झालेली पुरोगामी विचाराने तयार झालेली पिढी आणि अशिक्षित असणारी प्रतिगामी विचारांची पिढी या दोन वेगवेगळया मतांच्या पिढीत संघर्ष घडवून आणला आहे.

या कादंबरीतून महार जातीचा नायक आणि चांभार जातीची नायिका यांचा स्नेह पुढं त्यांचे भिंती तोडू पहाणारा आंतरजातीय विवाहात केलेले रूपांतर म्हणजे लेखकाने एका प्रकार जाती-जमातीतील भेदभाव नाहीसे व्हावेत या हेतून लेखन केलेले जाणवते. म्हणून कादंबरीचे शीर्षक. 'आता उजाडेल' या द्वारा एका नव्या युगाचा होणारा प्रारंभ असेच स्वरूप जाणवते.

कुमार अनिल यांनी 'भडास' च्या कादंबरीत चिंतनाचा 'भडास' झाला आहे असे वाटते. देवा धर्मापेक्षा माणूस मोठा आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात याचे प्रत्यंतर यामध्ये येते. ५० वर्षानंतर दलितांना असे जीवन काआले हा विचार करायला

लावणारी ही कादंबरी असून शोषण मुक्तीचा सामान्य माणसाचा अनुभव दिसून येतो. देवी बरोबर सती जाणे हा नवीन विचार आला आहे. भिकऱ्या हा लक्ष्मीची मूर्ती जाळतो. पुढच्या पिढीला एक आवाहन या कादंबरीने केले आहे. दलित साहित्याला नवीन वळण देणारी ताकद 'भडास' या कादंबरीत दिसून येते.

## दलित कादंबरीचा विकास :

दलित साहित्यिकांनी आत्मकथने, कथा, कविता, नाटक आणि कादंबरी इत्यादी वाङ्मय प्रकारातून लेखन केलेले दिसते. दलित साहित्यात कविता, आत्मकथने आणि कथा ज्या प्रमाणात लिहिल्या गेल्या त्या प्रमाणात दलित कादंबरीलेखन संख्येच्या आणि गुणात्मकतेच्या दृष्टीने फारसे झालेले दिसत नसले तरी देखील त्याला कमी मानता येणार नाही, असे मला वाटते. वास्तविक पाहता अनुभवांची दु:खद व विद्रोही अनुभूती व्यक्त करण्यासाठी कादंबरी लेखन हे अधिक व्यापक आणि समर्थ माध्यम आहे.

वैचारिकता हा दलित कादंबरीचा स्थायीभाव आहे. ती माणसाला केंद्रस्थानी मानते आणि त्याच्या जीवनाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करते. गरीब आणि दलित माणूस हा देशातील आणि जगातील कोणत्याही सुसंस्कृत माणसासारखाच असतो. म्हणून सुसंस्कृत माणसाला उपभोगता येणारे संपूर्ण हक्क दलितांना उपभोगता यावे. धर्माच्या नावावर विशिष्ट वर्गाला गुलामगिरीत राबविले जाण्याचा पुरस्कार करणाऱ्या कादंबरीहून दलित कादंबरी वेगळी आहे. दलित समाजाच्या माणूसपणाची उत्क्रांती उद्घोषित करणारा, माणसासारखे जगायचे आणि पुढे जायचे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा चिरंतन संदेश दलित कादंबरीला चैतन्य देणारा वाटतो. मानव केंद्रित बळ दलित कादंबरीला मिळाले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे.

हजारो वर्षाचा वाचाबंद समाज आता साहित्यनिर्मिती करीत आहे. हा केवळ साहित्यातीलच नव्हे तर जीवनातीलही अपूर्व चमत्कार आहे. अस्पृश्य तरूणांच्या

कोंडलेल्या मनाचा भावनिक स्फोट प्रथम दलित कादंबरी घडवू पहात आहे. गुदमरलेल्या अवस्थेतील आत्माविष्काराचे साधन म्हणून दलित लेखकांनी दलित कादंबरीचा आधार घेतला आणि या कादंबरीद्वारे व्यापक समाज जीवनाचे संबंध तात्विक पातळीवर लेखकाने उभे केले. सुरूवातीच्या दलितेतर कादंबरीने दलितांना वंचित ठेवले. याचे भान आल्यानंतर दलित कादंबरीकारांनी आपले जग कादंबरीत मांडण्यास सुरूवात केली. दलित कादंबरीतील वास्तव आणि मराठीतील स्वप्नरंजन या दोन भिन्न कृती ठरतात.

दलित लेखकाला आपले जळजळीत अनुभव व्यक्त करण्यासाठी हा वाङ्मयीन साचा सहज आणि सुलभ वाटण्याची शक्यता असल्यामुळे तो सुचला आहे. या माध्यमाद्वारे सामाजिक अन्याय, अत्याचाराचे अथवा सामाजिक प्रश्नांचे सर्वांगणी दिग्दर्शन आणि आकलन लोकांपुढे ठेवता येईल हा उद्देश होता. सामाजिक जाणिवा व्यक्त करून वाचकांच्या मनावर विशिष्ट परिणाम घडवून आणणे. स्वकीयांना क्रांतीसाठी उद्युक्त करणे, त्यांच्यात अन्यायाविरूद्ध लढण्याची युयुत्सूवृत्ती निर्माण करणे ही भूमिका दलित कादंबरीकारांची आहे. त्या कादंबरीतील संघर्ष व्यक्तिकेंद्रित नसून सामूहिक आहे. दलित कादंबरीचे आशय,विषय हे मराठी कादंबरीपेक्षा भिन्न स्वरूप घेऊन येतात.

गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव, साम्यवादी विचार आणि आंबेडकरांनी चालू केलेल्या दलितोद्धाराच्या कार्यानिमित्त घडलेल्या घटना या सर्वांचा परिणाम झाल्यामुळे मराठी कादंबरीत दलित समाज जीवन चित्रित होऊ लागले. दलित समाजजीवन चित्रणाची सुरूवात श्री.कृ.कोल्हटकर यांनी १९२५ साली लिहिलेल्या 'श्यामसुंदर' या कादंबरीपासून झाली. कोल्हटकरी वाङ्मयाच्या संस्काराच्या अनेक खुणा खांडेकराच्या वाङ्मयात आणि वाङ्मयीन प्रवृत्तीत सहज सापडतात. वि.स.खांडेकरांनी 'दोन मने'(१९३८) या कादंबरीत सार्वजनिक तळ्याचे पाणी अस्पृश्यांना मिळावे म्हणून केलेल्या सत्याग्रहाचे चित्रण येते.

'प्रतिज्ञा' या कादंबरीत ना.सी.फडके यांनी अस्पृश्य समाजाच्या मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहाचे वर्णन केले आहे. गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव पडून वामन मल्हार हयांच्या 'इंदू काळे सरला भोळे'(१९३४) या कादंबरीत सनातनी लोकांचा विरोध पत्करून रात्रीच्या शाळेत अस्पृश्य मुले येतात तसेच चिंगी नावाच्या महार जातीतील मुलीला आपल्या घरी सांभाळून पुढे तिचे मुंबईच्या एका सुशिक्षित माणसांशी लग्न लावतात असे दाखविले आहे. वि.वा.हडप हे उच्चवर्णीय पती-पत्नी अस्पृश्यांच्या सुधारणेसाठी पुढे येतात. गांधीजींच्या विचाराने हिंदू धर्मातील सनातनी विचाराच्या व्यक्तींचे ह्दय परिवर्तन होते. त्यामुळे कालांतराने का होईना अस्पृश्यता नष्ट होईल असा विचार मांडायला या काळातील दलितेतर लेखकांनी दलित लोकांच्याकडे सहानुभूतीच्या भूमिकेतून अस्पृश्य समाजाचे चित्रण करतात. त्यांच्या वर्णनामध्ये दु:खाचे, अन्याय, अत्याचाराचे वर्णन येते ते अगदी वरवरच्या स्वरूपाचे असते. दलितेतर कादंबरीकार विशिष्ट विचार प्रणालीतून दलित समाज जीवनाकडे पाहतात आणि म्हणून त्यांनी केलेल्या चित्रणात उणिवा सापडतात.

दलितेतर कादंबरीचा विचार केल्यानंतर दलित कादंबरीकारांचा विचार करणे महत्त्वाचे वाटते. दलित कादंबरीला खऱ्या अर्थाने सुरूवात ही अण्णाभाऊ साठे यांच्यापासून झाली. तर ना.रा.शेंडे यांची 'काजळी रात्र'(१९५६) शंकरराव खरात यांची 'माणुसकीची हाक'(१९५७) त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा'(१९५९) ही लिहिली गेली. पण या तीन कादंबऱ्यापैकी खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे यांची फकिरा हीच खरी पहिली दलित कादंबरी मानावी लागते. कारण अण्णाभाऊंनी या कादंबरीची सुरूवातच दलित जाणिवेतून केलेली दिसून येते. या कादंबरीत अण्णाभाऊंनी मांग समाजाची वस्ती निवडूंगाच्या फडात वसलेली दाखवून दलित जाणिव दाखविली. दलित कादंबरीत जास्त कादंबऱ्या लिहिणारे दलित कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख केला

जातो. अण्णाभाऊ साठे, ना.रा.शेंडे, शंकरराव खरात इत्यादींनी सुरूवातीच्या कांदबऱ्या लिहून दलित कादंबरीचा पायंडा घातलेला दिसतो. इथून पुढे दलित कादंबरी उत्तरोत्तर वाढत असताना दिसते.

प्रा. केशव मेश्राम यांनी 'हकिकत आणि जटायू' ही कादंबरी लिहून मराठी कादंबरीत मोलाची भर घातली आहे. यातील 'हकिकत' ही केशव मेश्रामांची आत्मकथा आहे. विषमतामूल आर्थिक, सामाजिक व्यवस्थेने माणूस म्हणून माणसाची किंमत न देता अपमान,मानभंग, छळ, उपेक्षाच केली. असे माणुसपण नाकारले गेलेल्या दलित व्यक्तिचे भविष्य कसे कुरतडले जाते याची आपल्या पूर्वाआयुष्यातील आठदहा वर्षाच्या कालखंडातील आत्मगत 'हकिगत' सांगितली आहे. 'जटायू' ही प्रतिकात्मक कादंबरी प्रतिमा (मिथ) योजताना कल्पकतेची आणि एका कलावंताची दृष्टी प्रत्ययाला येते. या कादंबरीतील अभिमन या पात्राच्या माध्यमातून जीवाची उलाढाल, अंधश्रद्धा, भोळसटपणा, गतानुगतिकता यांच्या जोखडातून हा समाज केव्हा आणि कसा मुक्त होणार? असे वर्णन केलेले आहे. 'पोखरण' ही मेश्रामांची आणखी एका कादंबरीत पुराण वास्तवात आजच्या दलित संवेदनशीलतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न गुंतलेले दाखविले आहेत.

बाबुराव बागूल यांची 'सूड' ही कादंबरी आकाराने लहान असली तरी देखील तीचे गुणसामर्थ्याने महान कलाकृती आहे. या कादंबरीतील कथानक एकदम चाकोरी वेगळे व अत्यंत खळबळजनक ठरलेली कहाणी आहे. दलित साहित्यातील अभिनव ठरावी अशी कादंबरी आहे. 'जानकी' ऊर्फ 'ज्वाला प्रसाद', 'सूड' कादंबरीची नायिका असून एका मुरळीची लेक जीवन वास्तवाच्या आगीत होरपळून निघालेली स्त्री दाखवून लेखकाने एका स्त्रीच्या दु:खाची कहाणीच या कादंबरीत मांडून स्त्री मुक्तीचा अकांत जानकीच्या माध्यमातून दाखविला आहे. 'झळ' कादंबरीतून बाबुराव गायकवाड यांनी एका उद्ध्वस्त दलित कुटुंबाची कथा साांगितली आहे. या कादंबरीचा नायक 'शेशू'

घरची गरीबी असून देखील अनेक संकटांना सामोरे जावून शिक्षण पूर्ण करतो असे चित्रण केले आहे.

'शुद्र' (१९८०) या कादंबरीतून सुधाकर गायकवाड यांनी 'नागनाथ' च्या माध्यमातून विद्रोही, पराक्रमी नायक दाखवून तो 'शुद्र' हा कलंक पुसून टाकण्याकरिता समाजाला शस्त्र सज्ज करतो शुद्रत्वाची मुद्रा मिटविण्यासाठी चाललेली आंबेडकर समाजातील मनाची तडफड 'शुद्र' कादंबरीमधून चितारली आहे. शुद्र हा कलंक पुसण्यासाठी नागनाथ मनाने विजयी होतो. अशा या कादंबरीत जातीयतेचा डाग पुसण्यासाठी केलेली धडपड पहावयास मिळते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर धर्मांतरीत दलित आणि अधर्मांतरीत दलित तसेच स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्या संघर्षांना खेडयापाडयात अधिक ऊत आला होता. या कथा भागावर आधारित हि.गो.बनसोडे यांनी 'मुक्तिसंग्राम' कादंबरी लिहिली आहे. 'युगप्रवर्तक'(१९८०) व 'झुंजार' या दोन चरित्रात्मक कादंबऱ्या लिहून हरिभाऊ पगारे यांनी वेगळाच पायंडा घातलेला आहे. 'युगप्रवर्तक' या चरित्रात्मक कादंबरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर लिहून डॉ.आंबेडकरांच्या जीवनाशी सुसंगत असणारे घटना, प्रसंग आणि त्यांच्या जीवनातील असंख्य घटनांचा तपशील माहित करून घेऊन अनेक प्रसंगाची मांडणी लेखकाने केली आहे. 'जोतिबा फुले' यांच्या जीवनावर आधारित 'झुंजार' कादंबरी लिहून त्यामध्ये जोतिबांच्या बालपण, शिक्षण, सामाजिक कार्याचा आढावा सावित्रीबाई फुलेंची विटंबना, जोतिबांना मदत करण्याची तिची धारणा, त्याग, सहनशीलता याचा परामर्श घेतला आहे.

'युगविधान', 'युगंधर' व 'युगान्त' या तीन कादंबऱ्या बा.स. हाटे यांनी लिहिलेल्या आहेत. 'युगविधान' या कादंबरीत चवदार तळ्याचा सत्याग्रह हा या कादंबरीच्या प्रेरणा स्थानी आहे. माणुसकीचे हक्क कोणी देत नसतात ते संघर्ष करून

मिळवावे लागतात. माणुसकीच्या पुन:स्थापनेसाठी केलेला महासंग्रामाचे या कादंबरीत वर्णन केले. 'युंगधर' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लेखकाने वापरलेले संबोधन आहे. १९२७ ते १९५६ या कालखंडातील डॉ. आंबेडकरांच्या कार्याच्या घडामोडी युगंधरमध्ये लेखकाने वर्णन केल्या आहेत. वर्णव्यवस्थेविरूद्धच्या वाटचालीत अत्यंत गौरवशाली कालखंड ताणतणाव लक्षात घेऊन हया कालखंडाचे चित्रण केले आहे. आंबेडकर चळवळीचे महत्त्व जाणून दलितांना एका वास्तवाशी प्रामाणिक राहण्याची शक्ती युगंधर, युगविधानांनी करून युगातल्या प्रतिक्षेत लेखकाने वाचकांना ताटकळत ठेवले आहे. बा.स.हाटे यांचे लिखान दलित कादंबरीचे महत्त्व वाढविणारे वाटते.

नामदेव ढसाळ यांनी 'हाडकी हाडवळा' व 'निगेटिव्ह स्पेस' या दोन कादंबऱ्या लिहून आपली कादंबरीतील छाप दाखवून दिली. वास्तववादी जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या या कादंबरीत 'बायजा' च्या कर्तबगार स्त्रीला नायकत्व देऊन, तिच्या कर्तृत्वाची ओळख ढसाळ या कादंबरीतून करून देतात. 'बायजाच्या' रूपाने एक धैर्यवान स्त्रीचे व्यक्तिमत्त्व त्यांनी उभे केले आहे. तसेच दलितांची होणारी ससेहोलपट या कादंबरीत मांडली आहे. 'निगेटिव्ह स्पेस'मधून लेखकाने गुन्हेगारी विश्व उभे करून आंबेडकरी विचाराचा पाईक दाखविला आहे. दलित साहित्यामध्ये महार, मांग जातीचे वर्णन करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. तसेच चांभार जातीचे वर्णन करणाऱ्या कादंबऱ्या माधव कोंडविलकर यांनी 'अजून उजडायचं आहे', 'कळा त्या काळच्या', 'अनाथ' इत्यादी लिहिल्या आहेत. 'अजून उजडायचं आहे' मधून माधव कोंडविलकर यांनी गावकीच्या कामात रात्रदिवस राबणाऱ्या देवजी चांभाराच्या दु:खाचे प्रसंग मांडले आहेत. देवजीच्या लहानपणातील शिक्षणाविषयी धडपड आणि वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आयुष्याला चिकटलेल्या धंदयाविषयीचे, चांभार जातीची जातपंचायत हाही कथाभाग आलेला आहे. 'अनाथ' ही भास्करने शिक्षणासाठी केलेल्या धडपडीची आणि

बेकारीमुळे निर्माण झालेल्या वैफल्याची कथा आहे. 'छेद' मधून दलित जातीमधील भयावह उच्चनिचता लेखकाने वर्णिली आहे. इ. कादंबरीचे लेखन कोंडविलकरांनी केले आहे.

तसेच 'मेलेले पाणी' आणि '७२ मैल' या कादंबऱ्यातून अशोक व्हटकर यांनी ढोर समाजाचा व्यवसाय कशा प्रकारे केला जातो व त्यांना सवर्णांकडून होणारा त्रास यांचे वर्णन आलेले आहे. त्याशिवाय ते गावकुसाबाहेरील दलित जातीतील परस्पर संबंध ही उघडून दाखवितात. हे एक प्रकारचे ढोर समाजातील व्यक्तिने स्वत:च्या अनुभवातून जाणिवेतूने या कादंबरीच्या रूपाने शब्दबद्ध केले आहे. 'श्राद्ध' मधून उत्तम कांबळे यांनी दलिता अंतर्गत संपूर्ण जातींना एकत्र आणून संघटना स्थापन केल्याशिवाय विकास साधता येणार नाही असा विचार लेखकाने या कादंबरीतून व्यक्त केला आहे. तमाशा करून पोट भरणाऱ्या एका घराण्याची कैफियत शशिकांत तासगावकर यांनी 'घराणं तमासगिराचं' या कादंबरीत मांडली आहे. 'कृष्णपक्ष' मधून पांडुरंग कदम यांनी पारंपरिक पद्धतीच्या रचना तंत्राला डावलून ही कांदबरी उभी केली आहे. 'कृष्णपक्ष' मधून बौद्ध धर्म स्वीकारलेल्या पूर्वाश्रमीच्या दलित तरूणाच्या शोकाकूल आयुष्याची कथा दाखविली आहे. तर 'झुलवा' कादंबरीत थोडं फार शिकून नर्स व्हावं एवढीच माफक आकांक्षा असलेल्या जगनला प्राप्त परिस्थितीत जोगतीणं व्हावं लागते. परिस्थितीविरूद्ध बंड करून उठलेल्या जगन या जोगतिणीची कथा उत्तम बंडू तुपे यांनी मांडली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोट्यावधी अनुयायांसह बौद्धधर्माचा स्वीकार करून बौद्धधम्माची दीक्षा दिली. परंतु सवर्ण समाजाने पूर्णपणे धर्मांतरितांना स्वीकारले नाही. बौद्ध म्हणून खेड्यापाड्यांतून त्यांचा भयंकर छळ होऊ लागला. आणि तरूणांना हा अपमान किंवा छळ सहन होत नाही. अशा तरूणांच्या मनाची झालेली अवस्था 'इस्कोट' या कादंबरीत भीमसेन देठे यांनी दाखविली आहे. मराठवाड्यांतील दलित

जीवन आणि मराठवाडा विदयापीठाच्या नामांतर चळवळीमुळे झालेली आंदोलने हा 'आग' या कांदबरीचा प्रमुख विषय बाबुराव गायकवाड यांनी 'आग' या कादंबरीचा नायक जातीने मांग असणाऱ्या मधूचे शालेय जीवनापासून ते आंबेडकरांच्या प्रेरणा होऊन महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या तरूणापर्यंतचे विविध पातळीवर चित्रण या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून केलेले आहे. आंबेडकरांचा वैचारिक वसा घेऊन खेड्यातील आपल्या पारंपरिक समाजात परिवर्तन करू इच्छितो. दलित जीवनाचे चित्रण करीत पुढे जाणारी 'आग' ही कादंबरी दलित तरूणांच्या मानसिकतेचे, खेडे गावातील दलित जीवनाचे व प्रवृत्तींचे चित्रण करते. दलित कादंबरीच्या इतिहासात गायकवाड यांनी 'आग' ही कादंबरी आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर एक वेगळे व्यक्तिमत्व घेऊन उभी राहते.

बाबुराव बागूल यांच्या 'कोंडी' कादंबरीमधून फुले, आंबेडकर या विचारधारेचे नेटके आविष्करण झालेले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांचे दर्शनही या कादंबरीतून होते. सम्यक परिवर्तनासाठी चळवळ हे आंबेडकरी चळवळीचे मुख्य सूत्र आहे. हेच सूत्र या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. कादंबरीचा नायक ध्येयवेडा, परिवर्तनाचा ध्यास घेतलेला, आंबेडकरी विचारांनी भारावलेला सुशिक्षित तरूण 'पावन' आहे. त्यांच्या विचारांशी एकरूप झालेली पावनची सुविद्य पत्नी सुशीला आहे. पुस्तकात रमणारा आणि समाजाचा विचार करणारा खूप शिकावे अशी इच्छा बाळगणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पश्यात समाजात गाजलेल्या दुहीचे गटबाजीचे पावनला दु:ख वाटते. त्याच्यातील क्रांतीकारी मन त्याला स्वस्थ बसू देत नाही. समाज एकसंघ करण्यासाठी दलितामध्ये एकजूट निर्माण करण्यासाठी पावन स्वत:च्या स्वप्नांना मूठमाती देऊन समाजकार्याला झोकून देतो. मुंबई लेबर कॅम्पमधील रामन, वासू व त्याला ही झोपडपट्टीत दहशत पसरविणारी, वाईट धंदे करणारी दादा मंडळी या कादंबरीत येतात.

उपहासाने तुंबलेल्या झोपडपट्टीतील बिभत्स ओंगळ जीवनाचे परिवर्तन व्हावे या ध्यासाने झपाटलेला नायक दिसतो.

माधव कोंडविलकर यांनी 'कळा त्या काळच्या', 'अनाथ', 'अजून उजाडायचं आहे' या बरोबर अलीकडे प्रकाशित झालेली 'आता उजाडेल' या कादंबरीत शोषित समाजाचे दु:ख, दारिद्रय, ज्ञान आणि त्यातून निर्माण होणारी शोकात्मक परिस्थिती याचे चित्रण केले आहे. 'आता उजाडेल' मध्ये महार जातीतील एक होतकरू मुलगा सुधीर आणि चांभारवाड्यातील एक तरूणी नलिनी यांच्या आंतरजातीय विवाहाची कथा येते. यात मुलींच्या आईवडिलांना मुलीच्या जातीने दिलेल्या मनस्तापाची कहाणी येते. आपला समाज जाती यांच्या भिंतीमध्ये पिढयानपिढया बंदिस्त राहणाऱ्या आणि तेच योग्य व श्रेष्ठ असे मानणाऱ्या मानसिकतेचे प्रभावी चित्रण कोंडविलकरांनी या कादंबरीत केले आहे. प्रा. सुधीर भंडारे आणि त्याची विद्यर्थिनी नलिनी यांच्या प्रेमकथेतून दलित जातीमधील भयावह, उच्चनीचता लेखकांनी वर्णिलेली आहे. सवर्णानी उदारभूमिका घेतली तरी दलितांचे आपापसातील भेदच त्यांना मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ देत नाहीत. तसेच सुशिक्षित झालेली पुरोगामी विचाराने तयार झालेली पिढी आणि अशिक्षित असणारी प्रतिगामी विचारांची पिढी या दोन वेगवेगळया मतांच्या पिढीचे वर्णन केले आहे. कुमार अनिल यांनी 'भडास' कादंबरीत देव धर्मापेक्षा माणूस मोठा आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात याचे प्रत्यंतर यामध्ये येते. देवी बरोबर सती जाणे हा नवीन विचार मांडला आहे. या कादंबरीतील भिकऱ्या हा लक्ष्मीची मूर्ती जाळतो . दलित साहित्याला नवीन वळण देणारी ताकत 'भडास' या कादंबरीत दिसून येते.

अशाप्रकारे या प्रकरणात दलित कादंबरीचा प्रारंभ ते २००२ पर्यंतचा आढावा घेतला आहे. या प्रकरणामध्ये दलित कादंबरीचा सर्वांगणी विचार करता दलितेतर लेखकांनी दलित जीवनावर ज्या कादंबऱ्या लिहिल्या, तो एका सामाजिक स्तराला

वाङ्मयीन क्षेत्रात यथायोग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. दलित कादंबरीकाराचा विचार करता यामध्ये काही लेखक नव्यानेच लिहू लागले आहेत. त्यांना कादंबरीच्या माध्यमाने नीट आकलन करण्यामध्ये काही मर्यादा प्डलेल्या दिसून येतात. वास्तविक कादंबरी हा व्यापक वाङ्मयप्रकार असल्याने व्यापक अशा जीवन आशयाला तो कवेत घेऊ शकतो. जीवनाच्या विविध पातळ्यातील ताणतणाव माणसामाणसांतील नातेसंबंध, पात्राची मानसिकता, इत्यादीची , अलिप्तपणे अनुभूती घेऊन त्याला विवेकशीलतेची जोड देऊन कादंबरीतून ते आविष्कृत होत गेलेले आहे. असे सामर्थ्य काही दलित कादंबरीकारात आहे. दलित जीवन जाणिवा अधिक प्रभावीपणे कादंबरीतून मांडला हे दलित कादंबरीच्या विकासाला उपकारक आहे असे वाटते. पुढील कादंबरीच्या विकासाला उपकारक आहे असे वाटते. पुढील प्रकरणात बाबुराव गायकवाड यांच्या 'झळ' आणि 'आग' या कादंबरीच्या आशयविशेषाचा विचार करू.

-----

15186

## संदर्भ सूची


१. 'फकिरा', अण्णाभाऊ साठे, सुरेश एजन्सी, पुणे, आवृत्ती दहावी पृ. ६

२. तत्रैव, पृ. १६२

३. 'वैजयंता' (प्रस्तावना) अण्णाभाऊ साठे, मॅजेस्टीक बुकस्टॉल, मुंबई, आवृत्ती चौथी,

४. 'निळी पहाट' रा.ग.जाधव,श्री. विद्या प्रकाशन, पुणे , दुसरी आवृत्ती

५. 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', गंगाधर पानतावणे, विजय प्रकाशन नागपूर-१९७६. पहिली आवृत्ती पृ. ८१

६. अस्मितादर्श, इंदूमती शेवडे - जा.फे.मा.८० पृष्ट ४०

७. दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन , दुसरीआवृत्ती

८. बलिदान, ज.वि.पवार

९. दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह , भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९८९, पृ. २१२.९

१०. अस्मितादर्श 'शुद्र'दि.अं. १९७७, ९१, सुधाकर शि. गायकवाड

११. तत्रैव, ९२.

१२. 'कोंडी' बाबुराव बागूल, प्रकाशिका -सौ.उषा मुलाटे, स्वरूप प्रकाशन ,आवृत्ती पहिली - जुलै २०००.

१३. दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन संपा. गंगाधर पानतावणे

१४. दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास योगेंद्र मेश्राम

१५. निळी क्षितीजे, रा.ग.जाधव

१६. आंबेडकरवादी साहित्य , यशवंत मनोहर

१७. साहित्य साधना, रा.गो.चवरे


-----